दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●सहसंपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०२ अंक-०२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, ३ मे २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-




## सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनमध्ये महिलांसाठी आरक्षण लागू

■ **मुंबई, यश सावंत :**

सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी आगामी निवडणुकांसह (२०२४-२५) सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन (रङइअ) पदांमध्ये किमान एक तृतीयांश महिला आरक्षण लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. २०२४-२५ च्या आगामी निवडणुकीत एससीबीएचे अध्यक्षपद एका महिला उमेदवारासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. ''२०२४-२५ च्या आगामी निवडणुकीत सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे, असं न्यायालयाने स्पष्ट केलं. या आरक्षणामुळे पात्र महिला सदस्यांना इतर पदांसाठी निवडणूक लढवण्यापासून रोखता येणार नाही, असेही खंडपीठाने म्हटलं. एससीबीएच्या पदाधिकाऱ्यांचे एक पद रोटेशनच्या आधारे केवळ महिलांसाठी राखीव ठेवण्यात यावे'', असे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायालयाने निर्देश दिले की SCBA च्या कनिष्ठ कार्यकारी समिती (९ पैकी ३) आणि वरिष्ठ कार्यकारी समिती (६ पैकी २) मध्ये महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षण असेल. २०२४-२५ या कालावधीसाठी SCBA अध्यक्षपद एका महिला उमेदवारासाठी राखीव ठेवण्याच्या न्यायालयाच्या निर्देशाला काही वकिलांनी आक्षेप घेतला. त्यांनी हे पद आणखी काही कालावधीसाठी राखीव ठेवण्याची सूचना केली. मात्र, खंडपीठाने आपली भूमिका बदलली नाही. खंडपीठाने आदेशात म्हटले आहे, ''आमचे असे मत आहे की एससीबीएने मंजूर केलेला कोणताही ठराव विचारात न घेता, कार्यकारी समितीमधील काही पदे बारच्या महिला सदस्यांसाठी राखीव असावीत.'' दरम्यान, १६ मे रोजी निवडणुका होणार आहेत. २०२४-२५ या कालावधीसाठी १६ मे २०२४ रोजी निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते.. १८ मे २०२४ रोजी मतमोजणी सुरू होईल. १९ मे रोजी निकाल जाहीर होतील. सध्याच्या समितीचा कार्यकाळ १८ मे रोजी संपत आहे. निवडणूक समितीमध्ये ज्येष्ठ वकील जयदीप गुप्ता, राणा मुखर्जी आणि मीनाक्षी अरोरा यांचा समावेश असेल.

## अमित शाहांचा डीपफेक व्हिडीओ शेअर केला म्हणून थेट झारखंड काँग्रेसच्या एक्स अकाऊंटवर कारवाई




■ **नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

गेल्या काही दिवसांपासून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा एक डीपफेक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. यासंदर्भात राजकीय वतुर्ळात मोठ्या प्रमाणावर आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळाले. यासंदर्भात आता झारखंड काँग्रेसच्या एक्स (ट्विटर) अकाऊंटवर कारवाई करण्यात आली आहे. अमित शाह यांचा डीपफेक व्हिडीओ शेअर केला म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. तसेच, यासंदर्भात काँग्रेसच्या सोशल मीडिया सेलच्या पदाधिकाऱ्यांना नोटीसही बजावण्यात आली आहे. यासंदर्भात आता काँग्रेसकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

झारखंड काँग्रेसच्या एक्स अकाऊंटवर ''Account Withheld'' असा संदेश येत आहे. त्याचबरोबर कायदेशीर कारवाई म्हणून हे अकाऊंट बंद करण्यात आल्याचंही यात नमूद करण्यात आलं आहे. ऐन लोकसभा निवडणुकांच्या धामधुमीत विरोधी पक्षाच्या सोशल मीडिया हँडलवर कारवाई करण्यात आल्यामुळे त्यावरून राजकीय टीका-टिप्पणी सुरू झाली आहे. झारखंड काँग्रेसकडूनही या कारवाईचा निषेध करण्यात आला आहे.

झारखंड काँग्रेसच्या एक्स अकाऊंटवरून अमित शाह यांचा व्हायरल व्हिडीओ शेअर करण्यात आला होता. यासंदर्भात कायदेशीर कारवाईची मागणी झाल्यानंतर त्यानुसार पोलिसांनी कारवाईही सुरू केली आहे. मात्र, हा डीपफेक व्हिडीओ शेअर केल्यामुळे भाजपाकडून झारखंड काँग्रेसच्या एक्स अकाऊंटवरील मजकुराबाबत आक्षेप नोंदवण्यात आला होता. त्यानुसार हे अकाऊंट बंद करण्यात आल्याची माहिती एक्सकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, अमित शाह यांच्या डीपफेक व्हिडीओप्रकरणी दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटरनं यासंदर्भात तक्रार केल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात झारखंड काँग्रेस प्रमुख राजेश ठाकूर यांना दिल्ली पोलिसांनी नोटीसही बजावली आहे. मात्र, नोटीस का बजावली आहे, हेच कळत नसल्याचं राजेश ठाकूर म्हणाले आहे.

''मला नोटीस मिळाली आहे. पण मला नोटीस का बजावली हेच मला कळत नाहीये. ही सरळ सरळ हुकुमशाही आहे. जर यासंदर्भात काही तक्रार दाखल झाली असेल, तर मग आधी त्यांनी माझं एक्स अकाऊंट तपासायला हवं. निवडणूक प्रचार सुरू असताना प्रचारात माझा सहभाग साहजिक आहे. अशा स्थितीत त्यांनी माझा लॅपटॉप आणि इतर सर्व गॅजेट्सची मागणी केली आह'', असं राजेश ठाकूर म्हणाले.

## वांद्रे सरकारी वसाहतीतील कर्मचारी निवडणुकीवर टाकणार बहिष्कार, मालकी हक्काने घरे देण्याची मागणी

■ **मुंबई, विशाल कारंडे:**

वांद्रे पूर्व येथील सरकारी वसाहतीतील घरे जोपर्यंत माफक दरात मालकी हक्काने देण्याचा निर्णय जाहीर होत नाही तोपर्यंत लोकसभा तसेच यापुढे येणाऱ्या सर्व निवडणुकांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय या वसाहतीतील सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. याबाबतचे पत्रक या वसाहतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांनी संयुक्तपणे जारी केले आहे. गेल्या २५ वर्षांपासून मालकी हक्काने माफत दरात घर मिळावे यासाठी सरकारी वसाहतीतील कर्मचारी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा




करीत आहेत. मात्र सकारात्मक निर्णय घेऊन या आश्वासनापलीकडे शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतलेला नाही. विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या माध्यमातून झोपडीधारक, गिरणी कामगार, बीडीडी चाळ, सफाई कामगार, संक्रमण शिबिरातील रहिवासी, अतिक्रमित तसेच बेकायदा बांधकाम करणाऱ्या सर्वांनाच मोफत घरे दिली जातात. याशिवाय खेळाडू, कलाकार, साहित्यिक, पत्रकार आदींना घरे वा मोफत दरात भूखंड दिले जातात. काळाचौकी येथील सरकारी वसाहतीत राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना नाममात्र दरात घरांचा मालकी हक्क देण्यात आला आहे. बीडीडी चाळ प्रकल्पात रहिवाशांना ५०० चौरस फुटांचे घर देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तेथील पोलिसांना १५ लाखांत ५०० चौरस फुटांचे घर देण्याचा निर्णय झाला आहे. पण वांद्रे सरकारी वसाहतीतील १३५ एकर भूखंडापैकी ४५ एकर भूखंडावरील बेकायदा झोपड्यांनाही मोफत घर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या परिसरात सनदी अधिकारी, न्यायाधीशांना १२ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यावर त्यांच्या गृहनिर्माण संस्था उभ्या आहेत. सर्वांसाठी शासनाकडे योजना आहेत. मात्र ३० ते ३५ वर्षे चाकरी करणाऱ्या सरकारी वसाहतीतील कर्मचाऱ्यांसाठी कुठलीही योजना नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर बेघर व्हावे लागत आहे. यापैकी अनेकांची दुसरी वा तिसरी पिढी आहे. अनेकांचे मुंबईत स्वतःचे घर नसल्यामुळे बाजारभावाने घर विकत घेणे शक्य नसल्याने सरकारी वसाहतीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे सरकारी वसाहतीत मालकी हक्काने माफक दरात घर द्यावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे या लोकसभा निवडणुकीसह पुढील सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पत्रक गव्हर्नमेंट क्वार्टर्स रेसिडेन्ट्स असोसिएशन, चतुर्थ श्रेणी रहिवासी कर्मचारी संघ आणि नियोजित शासकीय वसाहत रहिवासी सहकारी गृहनिर्माण संस्था आदींनी संयुक्तपणे जारी केले आहे.

## कोथरूडमधील ढाब्यावर बेकायदा मद्य विक्री करणाऱ्या ढाबाचालकासह चौघांना अटक; एक लाखांचा दंड



■ **पुणे, विशाल पाटील:**

कोथरूडमधील ढाब्यावर बेकायदा दारू विक्रीचा प्रकार राज्य उत्पादन शुल्क विभागाने उघडकीस आणला. उत्पादन शुल्क विभागाकडून परवाना न घेता दारू विक्री प्रकरणात ढाबाचालकासह चौघांना अटक करण्यात आली. आरोपींना अटक केल्यानंतर न्यायालयात त्वरित आरोपपत्र दाखल करण्यात आले. न्यायालयाने ढाबाचालकाला एक लाख रुपयांचा दंड, मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी दोन हजार रुपयांचा दंड सुनावला. दंड न भरल्यास दोन महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली.

राज्य उत्पादन शुल्क ह्यसी ह्य विभागाच्या पथकाने कोथरूड येथील हॉटेल खिंड या ढाब्यावर नुकताच छापा टाकला. ढाबा चालक योगेश सुरेश माथवड याने ग्राहकांना दारू पिण्याची व्यवस्था उपलब्ध करुन दिल्याचे आढळून आले. त्यानंतर माथवड यांच्यासह चार ग्राहकांना अटक करण्यात आली. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एस. एस. कदम, दुय्यम निरीक्षक प्रताप बोडेकर, किरण पाटील, सहायक दुय्यम निरीक्षक संदीप लोहकरे, उज्ज्वला भावड, शरद भोर, गोपाळ कानडे, सचिन इंदलकर यांनी ही कारवाई केली.

लोकसभा निवडणुकीसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून बेकायदा मद्य विक्री, तसेच बनावट मद्य निर्मिती, वाहतूक, विक्री रोखण्यासाठी पथके नेमण्यात आली आहेत. परराज्यातील मद्य वाहतुकीवर करडी नजर ठेवण्यात आली असून, ढाबा, हॉटेलची अचानकपणे तपासणी सुरू करण्यात आली आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध या पुढील काळात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा निरीक्षक एस. एस. कदम यांनी दिला आहे.

### महाराष्ट्रातला बुलढाणा जिल्हा झाला 'डीजेमुक्त'

## यापुढे आरटीओ विभागाद्वारे डीजे धारकांवर राहणार कडक वॉच

■ **बुलढाणा, सचिन कदम:**

सध्या लगीनसराई सुरू आहे, लग्न सोहळ्यात अनेकजण डिजे (ध्वनीक्षेपक) लावताना दिसत आहेत. अशातच डीजेच्या वाढत्या आवाजामुळे आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे दिसत आहे. तर काही ठिकाणी आक्षेपार्ह गाणे वाजवल्यामुळे दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी पोलिस विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. यापुढे बुलढाणा जिल्ह्यात डीजे वाजविण्यावर बंदी करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. एसपी सुनील कडासणे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मर्यादेपेक्षा जास्त आवाज असला किंवा परवानगी नसली तर डीजेचे वाहन थेट पोलिस ठाण्यात जमा करण्याचे आदेश पोलिस कर्मचारी यांना दिल्याचे सांगितले. ते म्हणाले आतापर्यंत २२ डीजे धारकांवर कारवाई करण्यात आली आहे. एसपी सुनील कडासणे म्हणाले नागरिकांनी कायद्याचे पालन करून आनंद साजरा करावा. मानवी जीवाला कुठल्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा कठोर स्वरूपाची कारवाई करण्यात येईल. डीजे गाड्यांच्या मॉडिफिकेशन बाबत प्रतिबंध लावण्यासाठी आरटीओ विभागातून सूचना दिल्या गेल्या आहेत. त्यामुळे पोलिस विभाग तसेच आरटीओ विभागाद्वारे आता डीजे धारकांवर कडक वॉच वाचणार आहे. आता यापुढे जिल्ह्यात डीजे वाजविण्यावर जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे तसे पत्र जिल्हाधिकारी यांनी देखील प्रसारित केले आहे.



## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी-चिंचवडच्या वतीने वासुदेव करतोय मतदान जनजागृती

■ **पुणे, अभिजित येरल्लू:**

एकजुटीनं .. दुरदृष्टिनं चला गाजवू मैदान.., राष्ट्रहितासाठी करायचं मतदान.., लोकशाहीचा करायचा सन्मान..,१०० टक्के हो करायच मतदान.., लोकशाहीचा करायचा सन्मान.. हा वासुदेवांचा आवाज अलीकडे मावळ लोकसभा मतदार संघातील पिंपरी-चिंचवडमध्ये सकाळी घुमत असल्याचे दिसते. निमित्त आहे लोकसभा निवडणुकीचे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी - चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्या संकल्पनेतून शहराच्या विविध भागात ही मतदान जनजागृती होत आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्याचे मतदान पार पडले मात्र त्यामध्ये मतदानाची



टक्केवारी कमी झालेली दिसते आहे. मावळ लोकसभा मतदार संघात मतदारांना मतदान करण्यास प्रेरणा देण्यासाठी अ. भा. नाट्य परिषदेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मतदान जनजागृती करत असलेले वासुदेव हे नाट्यकर्मी नसून खरेखुरे वासुदेव आहेत. त्यांच्या मार्फतलोक गीतांच्या माध्यमातून ही जनजागृती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. शहरातील नव मतदार असलेल्या तरुणाईने मतदानासाठी घराबाहेर पडावे, आपण मतदान केले नाही तर काय फरक पडतो? अशी भूमिका काही लोक घेत असतात त्यांनाही मतदान केंद्रापर्यंत जा, मतदान करून आपले कर्तव्य बजवावे असे आवाहन हे वासुदेव करत आहेत. शहरातील उद्याने, सोसायट्या आणि विविध भागात सकाळी ६ ते १० या वेळेत ही जनजागृती करण्यात येत आहे. या मतदान जनजागृती साठी वासुदेवांना मार्गदर्शन आणि त्यांच्या मार्गाचे नियोजन आदी बाबी नाट्य परिषदेच्या वतीने राजेंद्र बंग, आसाराम कसबे, संतोष रासने सांभाळत असल्याचे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.



## पोलिस दलामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी-अंमलदारांना महाराष्ट्रदिनी 'पोलिस महासंचालक पदक' सन्मानपूर्वक प्रदान

■ **नाशिक, नितीन देवळेकर :**

पोलिस दलामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी-अंमलदारांना जाहीर करण्यात आलेल्या पोलिस महासंचालक पदक महाराष्ट्रदिनी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. नाशिक शहर, ग्रामीण, कारागृह पोलिस दलात वैशिष्ट्यपूर्ण कर्तव्य बजाविणाऱ्या ४१ अधिकारी-कर्मचाऱ्यांना महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये नाशिक गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य चंद्रकांत गवळी, राज्य गुप्तवार्ता विभागाच्या उपायुक्त गीता चव्हाण, नाशिक ग्रामीणचे उपविभागीय अधिकारी बाबुराव दडस यांसह नाशिक शहरचे पोलिस निरीक्षक प्रकाश पवार, ग्रामीणचे निरीक्षक रघुनाथ शेगर, सत्यजित आमले, शहरचे उपनिरीक्षक नारायणगीर गोसावी, सहायक उपनिरीक्षक विजय आहेर. विजय लभडे, विजय कडाळे, ललितकुमार केदारे, ग्रामीणचे दिलीप पगार, पंढरीनाथ टोपले, सुहास छत्रे यांचा समावेश होता. तसेच शहरचे अंमलदार बाळासाहेब मुर्तडक, सुरेश सोनवणे, आशा सोनवणे, काशिनाथ बागूल, मनोहर नागरे, चंद्रकांत गवळी, शरद आहेर, अनिल लोंढे, नंदकुमार नांदुर्डीकर, दत्तात्रय खैरे, महेश साळुंके, कैलास महाले, किशोर ठाकूर. महेश नांदुर्डीकर, विशाल काठे, श्रीकांत कर्पे, विशाल जोशी, महाराष्ट्र पोलिस अकादमीतील अंमलदार संजय निफाडे, संजय पाटील, रंगराव ईशी, विठ्ठल खेडकर, नाशिक गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयातील अंमलदार विनोद पाटील, ग्रामीणचे प्रवीण काकड, कैलास मुंढे, अमोल घुगे, नितीन डावखर, योगेश पाटील, मध्यवर्ती कारागृहातील उपअधीक्षक सचिन चिकणे, हवालदार किरण पाटील यांनाही सन्मानित करण्यात आले. शहर पोलीस आयुक्तालयाच्या सभागृहात आयोजित सोहळ्याप्रसंगी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त प्रशांत बच्छाव, किरणकुमार चव्हाण, मोनिका राऊत यांच्यासह सहायक आयुक्त, पोलीस निरीक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक सहायक निरीक्षक धर्मराज बांगर यांनी केले. सहायक आयुक्त डॉ. सीताराम कोल्हे यांनी आभार मानले.

## ठाणेकरांसाठी पालिकेची कर सवलत योजना

## १०% पासून ते २%पर्यंत मिळणार करसवलत

■ **ठाणे, रोहित जैसवाल :**

ठाणे महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीसाठी अर्थसंकल्पात ठरवून दिलेले उद्दीष्ट गाठण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाणेकरांसाठी पालिकेने कर सवलत योजना लागू केली आहे. यामध्ये थकीत रक्कमेसह संपूर्ण वषार्चा मालमत्ता कर भरल्यास दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करात दहा टक्क्यापासून ते दोन टक्क्यांपर्यंत सवलत ठाणेकरांना मिळणार आहे. यानिमित्ताने ठाणेकरांवर पालिकेने कर सवलतींचा वर्षाव केल्याचे चित्र दिसून येत आहे. ठाणे महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणून मालमत्ता कर ओळखला जातो. करोना काळात केवळ मालमत्ता कराची अपेक्षित वसुली झाली होती. या करामुळेच पालिकेला काहीसा आर्थिक दिलासा मिळाला होता. पालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये विविध विभागांना कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात येते. अशाचप्रकारे या विभागाला २०२३-२४ मध्ये ७५० कोटींच्या कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले होते. परंतु वर्षाअखेर ७०३.९३ कोटींची कर वसुली करण्यात पालिकेला यश आले. यंदाच्या अर्थसंकल्पात ८१९.७१ कोटींच्या कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले आहे. हे उद्दीष्ठ गाठण्यासाठी पालिका प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. आता हे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी पालिका प्रशासनाने प्रयत्न सुरू केले असून त्यासाठी १ एप्रिल पासूनच करदात्यांना देयके व कर भरण्याच्या लिंकसह एसएमएसद्वारे पाठविण्यात आली आहेत. तसेच, मालमत्ता कराची छापील देयकेही वितरित करण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या वर्षी पालिकेने हाच प्रयोग केला होता आणि त्यात यश आल्यामुळे पालिकेने यंदाही गेल्यावर्षीची संकल्पना राबविली आहे. त्याचबरोबर करदात्यांनी लवकरात लवकर कर भरावा आणि पालिकेच्या तिजोरीत महसुल जमा व्हावा या




उद्देशातून पालिकेने ठाणेकरांसाठी कर सवलत योजना लागू केली आहे. या योजनेनुसार थकीत रक्कमेसह संपुर्ण वषार्चा मालमत्ता कर भरल्यास दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करात दहा टक्क्यापासून ते दोन टक्क्यांपर्यंत सवलत ठाणेकरांना मिळणार आहे. १५ जून पर्यंत कर भरल्यास १० टक्के, १६ ते ३० जून या कालावधीत कर भरल्यास ४ टक्के, १ ते ३१ जुलै या कालावधीत कर भरल्यास ३ टक्के आणि १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत कर भरल्यास २ टक्के सवलत दिली जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने दिली आहे. महापालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयातील संकलन केंद्र तसेच मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्रामधील संकलन केंद्र कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत तसेच शनिवारी व सर्व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहेत. या शिवाय, क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, चेक, डीडी तसेच रोखीने कर भारणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गुगल पे, फोन पे, भीम ॲप, पेटीएम मार्फत सुलभतेने मालमत्ता कराचा भरणा करू शकतात, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली.

## बालाजी मंदिराची सीआरझेड मंजुरी अडचणीत... हरित लवादाने स्वीकारला पर्यावरणप्रेमींचा अर्ज

■ **नवी मुंबई, भावना जैन:**

नवी मुंबईतील उलवे किनारपट्टीवरील बालाजी मंदिरासाठी दिलेल्या सीआरझेड मंजुरीला आव्हान देणारा पर्यावरणप्रेमींचा अर्ज राष्ट्रीय हरित लवादाने स्वीकारला आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे. हरित लवादाच्या पश्चिम विभागीय खंडपीठाने न्यायिक सदस्य म्हणून न्या. दिनेश कुमार आणि तज्ञ सदस्य म्हणून डॉ. विजय कुलकर्णी यांचा समावेश केला आहे. तसेच, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला याबाबत चार आठवड्यांत उत्तर देण्यासाठी नोटीस



बजावली आहे. 'बालाजी मंदिराचा भाग सीआरझेडमध्ये येतो. त्यामुळे मंदिरासाठी केलेले भूखंडाचे वाटप आणि दिलेली सीआरझेड मंजुरी बेकायदा आहे. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीने चुकीच्या पद्धतीने मंदिरासाठी सीआरझेड मंजुरी दिली आहे. मंजुरीचा अर्ज केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे करणे गरजेचे होते,' असे नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीने भूखंडाच्या सीआरझेड कक्षेत न येणाऱ्या भागात बांधकामाला परवानगी दिली आहे, परंतु सीआरझेड १ भागावर, ५० मीटर खारफुटीच्या बफर झोनमध्ये कम्पाउंड वॉल आणि लॉनला परवानगी दिली असल्याने 'नॅटकनेक्ट'चा याला विरोध आहे. कुमार यांच्या वकील रोनिता भट्टाचार्य यांच्या युक्तिवादाची दखल घेऊन लवादाने अर्ज स्वीकारला असून या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० ऑगस्ट रोजी ठेवली आहे. हे प्रकरण न्यायालयात उभे राहिले असल्याने पर्यावरणप्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (अटल सेतू) बांधताना छोट्या-मोठ्या कामांसाठी तात्पुरत्या स्वरूपात 'कास्टिंग यार्ड' बांधण्यात आले होते. तिथे आता मंदिर उभारले जात आहे, असा दावा स्वयंसेवी संस्थेने केला आहे. तसेच, २०१९मध्ये कास्टिंग यार्ड उभारण्यापूर्वी समुद्रकिनाऱ्याचे 'गुगल अर्थ' नकाशे सादर करण्यात आले आहेत, ज्यामध्ये ओलसर जमीन, चिखल आणि विरळ खारफुटी दिसत आहे.

## मंदिरातील दानपेट्या फोडणाऱ्या ४ अट्टल चोरट्यांना खोपोली पोलिसांनी ठोकल्या बेड्या

■ **रायगड, दिगंबर जाधव :**

खालापूर तालुक्यातील २ मंदिरातील दानपेट्या फोडणाऱ्या चार अट्टल चोरट्यांना खोपोली पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून ७ लाख २ हजारांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. दरम्यान या चोरट्यांनी आतापर्यंत रायगड ते गोवा या किनार पट्टीवर अनेक मंदिरात डल्ला मारल्याची बाब तपासात समोर आली आहे. अलिबाग-खोपोली येथील खालापूर तालुक्यातील दोन मंदिराची दानपेटी फोडून पळ काढलेल्या चार अट्टल चोरट्याना खोपोली पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. राजू फरत शेख (वय २७), इम्रान शहीद शेख (वय २४), राकीब कुलमोहंमद शेख, (वय २८) व मुजाहिद गुलजार खान (वय २८) अशी आरोपीतांची नावे आहेत. इम्रान आणि राकीब हे दोघेही मुळ राहणारे बांग्लादेशचे असल्याचा अंदाज असून त्यादृष्टीने तपास सुरु आहे. हे चारही आरोपी मागील चार वर्षापासून वेठबीगारीच्या कामासाठी सीबीडी बेलापूर येथे व्यास्तव्यास असल्याचे जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे




यांनी सांगितले. खोपोली येथील तेज फार्म हाऊसजवळ असणाऱ्या बहिरी देव मंदिर येथे २५ एप्रिलला रात्री आणि शीलफाटा-खोपोली येथील श्री हनुमान मंदिर येथे २६ एप्रिलला रात्री या चौघांनी मंदिरांचे दरवाजे तोडून मंदिरातील दानपेट्या फोडून सुमारे १८ हजार रुपयांची रोख रक्कम चोरी केल्याच्या घटना घडलेल्या होत्या. त्याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनांचे गांभीर्य ओळखून तांत्रिक तपासाच्या आधारे चोरी करणाऱ्या आरोपींचा मार्ग काढून खोपोली येथून पनवेल येथपर्यंत सर्व प्रथम पाठलाग केला. परंतू तत्पूर्वीच आरोपी पनवेल येथून निसटले होते. त्यानंतर गोवा येथे पोहोचल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तपास पथक गोवा येथे पोहोचून म्हापसा येथे आरोपींचा शोध सुरु केला. त्यावेळी तपास पथकास म्हापसा, गोवा येथे एका मोठ्या मंदिरामध्ये मोठ्या रक्कमेची चोरी झाल्याची माहिती मिळली. ही चोरी देखील याच आरोपींनी केल्याची खात्री झाली. त्यावेळी हे आरोपीत सावंतवाडी येथे पोहोचल्याची माहिती मिळाल्याने तपास पथक तातडीने सावंतवाडी येथे पोहोचले व तेथे चारही आरोपीतांना शिताफीने ताब्यात घेतले. अटक आरोपी राजू फरत शेख याने त्याच्या वाट्याला आलेल्या रक्कमेपैकी १ लाख ३३ हजार रुपये इतकी रोख रक्कम नातेवाईकाच्या बांग्लादेश येथील एका बँक अकाऊंटमध्ये वर्ग केली असल्याचेही तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

घरात खूप वांगी असतील, भरली किंवा मसाल्याची भाजी करण्यास वेळ नसेल, तर एक झटपट भाजी म्हणून हा प्रकार करावा. सोपी कृती आहे, कष्ट फारसे नाहीत. एका बाजूला पोळ्या करताना सहज होऊन जाते.

# वांग्याची झटपट सुकी भाजी



**साहित्य** : ताजी वांगी पाव किलो /८-९ (मोठ्या आकाराची असतील तर उत्तम), कोथिंबीर बारीक चिरून, लाल तिखट चवीनुसार, मीठ चवीनुसार, धण्याची पूड चिमूटभर, हळद चिमूटभर, दाण्याचे कूट /तिळाचे कूट, तेल थोडेसे-फोडणीसाठी, हिंग, कुठला तुमचा खास गरम /काळा /घरगुती मसाला असेल तर तोही घ्या चिमूटभर, नाहीतर फार विचार न करता चिमूटभर गरम मसाला द्या ढकलून, चार दाणे साखर.

**पाककृती** : जाड बुडाच्या कढईत तेल तापत ठेवावे. नेहमीच्या फोडणीला घेतो त्यापेक्षा जास्तच तेल घ्यावे. अंदाजे छोटी अर्धी वाटी वगैरे. ताजी रसरशीत वांगी घ्यावीत. काटे काढून टाकावेत. वांग्याच्या उभ्या फोडी चिरून घ्याव्यात. पाण्यात भिजवू नये. सगळी तयारी करून शेवटी वांगी चिरून थेट फोडणीत घालता येतील असे पाहावे. तेल तापले की त्यात मोहरी/जिरे तडतडवून आणि हिंग घालून फोडणी करावी, चिरलेली वांगी फोडणीत घालून नीट मिसळून घ्यावे. आता कढईवर झाकण ठेवून अत्यंत मंद आचेवर वांगी स्वतःच्या रसात वाफेवर शिजतील या आशेवर पोळ्या किंवा इतर वेळखाऊ काम करावे. १५-२० मिनिटात वांगी चांगली परतल्या जातात आणि त्यांच्या आकार बदलतो. भाजीच्या फोडी परतून झाल्यानंतर त्यात लाल तिखटाची पूड, मीठ, हळद, मसाला, दाण्याचे कूट, साखरेचे फक्त ४ दाणे घालून मिसळून घ्यावे/ पुन्हा एकदा कढईवर झाकण ठेवून अत्यंत मंद आचेवर ५ मिनिटे ठेवावे. शेवटी सजावटीसाठी कोथिंबीर आहेच! अशाच प्रकारे गवारीच्या शेंगेचे दोन भाग तोडून तिचीही सुकी भाजी करता येते.

**अधिक टिप्स : ■ फार मसाले वगैरे लागत नाहीत. तेल जास्त लागते मात्र! ■ ही भाजी शक्य तितक्या मंद आचेवर होऊ द्यावी ■ यात कांदा,लसूण, आलं वगैरेची गरज नाही, पण आवडत असेल तर फोडणीत बारीक ठेचून घालू शकता.**

# बियरचा वापर केल्याने केस होतात सिल्की आणि शाईन

**सुंदर केस एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात अधिक भार टाकतात. मग तो पुरुष असो की महिला. सर्वांनाच आपल्या केसांना शाइनी आणि सिल्की ठेवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांच्या प्रॉडक्ट्सचा वापर करावा लागतो, पण या प्रॉडक्ट्समुळे केसांना नुकसान होण्याची भीती सदैव असते. म्हणून घरगुती कंडिशनरच केसांसाठी उत्तम असतात. म्हणून जाणून घेऊ अशा काही घरगुती कंडिशनर्सबद्दल...**

■ एक कप बियरला एखाद्या भांड्यात तोपर्यंत गरम करा जोपर्यंत त्याचे प्रमाण अर्धे राहत नाही. गरम केल्याने बियरमधील अल्कोहोल वाफ बनून उडून जाते. आता याला गार होऊ द्या, नंतर यात आपल्या पसंतीचा शॅम्पू मिसळून द्या, लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे ज्या शॅम्पूचा वापर करत असाल तो एकाच ब्रँडचा असायला पाहिजे. या घोळला एका बाटलीत भरून ठेवा. जेव्हा कधी केस धुवायचे असतील याने केस धुवा, यामुळे राठ केसांमध्ये देखील निखर येईल. केस चमकदार आणि सुंदर दिसतील.

■ केळी केसांसाठी फारच उत्तम मानण्यात आले आहे. केळींची पेस्ट तयार करून त्यात काही थेंब मधाचे टाकून ही पेस्ट ३० मिनिटांपर्यंत केसांवर लावून ठेवावी. नंतर गार पाण्याने केस धुवून टाकावे.



■ आपल्या केसांना शॅम्पूने धुतल्यानंतर बियरचे काही थेंब पाण्यात घालून त्या पाण्याने एकदा परत केस धुवून टाकावे. नंतर स्वच्छ पाण्याचे धुवावे. बियरमुळे तुमच्या केसांमध्ये चमक येईल आणि ते प्राकृतिकरीत्या मजबूत होतील.

■ केसांना शाईनी बनवण्यासाठी दह्यात शॅम्पू घालून आधीपासून लावून ठेवावे. डोक्यात जर कोंडा असेल तर काही थेंब लिंबाचा रस त्यात घालून केसांना लावावे. वर दिलेले हे उपाय केल्याने नक्कीच फायदा होईल.

**प्रत्येकाला आपलं वजन कमी झालं पाहिजे अशी तीव्र इच्छा असते. यासाठी सगळे उपाय करण्यासाठी आपण तयार असतो.**

# शरीरातील कॅलरी कमी करण्यासाठी हे करा...

**अनेक** प्रयत्न करूनसुद्धा वजन कमी करण्याबाबत आपण अपयशी ठरतो. जास्त कष्ट न घेता आपण घरगुती उपाय करून शरीरातील जास्त कॅलरी कमी करू शकतो.

**घरबसल्या हे सोपे उपाय करा..**

■ फळ रस पिण्याऐवजी जास्त फळे खा. फळांमध्ये फायबर आणि साखरेचे संतुलित प्रमाण असते यामुळे कॅलरी वाढत नाहीत. ■ पालेभाज्या आणि फळभाज्यांचा आहारात जास्तीत जास्त समावेश करा. मांसाहारी जेवण होईल तेवढं टाळण्याचा प्रयत्न करा. ■ घाईघाईत जेवू नये जेवण चावून खा त्याने शरीरातील कॅलरीज कमी होतात. ■ योग्य तेवढी झोप पूर्ण घ्या त्यामुळे कॅलरी वाढण्याचे प्रमाण कमी होते.



# आरोग्याचा स्त्रोत – जिरा पाणी

**सकाळी** उपाशीपोटी पाणी पिणे किंवा तांब्याच्या भांड्यात साठवलेले पाणी पिणे म्हणजे आरोग्याचे वरदान हे आपण बरेचदा वाचलेले आहे. परंतु याच पद्धतीने दिवसभरात कधीतरी एक ग्लासभर जिरा पाणी प्राशन केले तर आरोग्याला खूप मदत होते. जिरा पाण्यामुळे शरीरात पाचकद्रव्ये मोठ्या प्रमाणावर तयार होतात आणि पचन क्रियेला गती मिळते. पोटाच्या विकारावर जिरा पाण्याचा उपयोग होतो. प्यायलेले पाणी शरीराला उपयोगी पडतेच असे नाही. परंतु जिरा पाणी प्राशन केल्याने तेही रात्री झोपताना प्राशन केल्याने दिवसभरात प्यायलेले पाणी उपयोगी पडायला लागते. जिरा पाण्यात पोटॅशियम असते आणि त्यामुळे रोग प्रतिकारशक्ती वाढते. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी इतरही अनेक द्रव्ये उपयोगी पडतात. जिरा पाणी प्यायल्याने अशक्तपणा कमी होतो. कारण जिऱ्यातील आयर्न म्हणजेच लोह त्यादृष्टीने उपयोगी पडत असते. त्याच्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होतो. जिरा पाण्याने रक्तदाब आटोक्यात राहतो आणि वजन घटण्यास मदत होते. शरीरातील चयापचय क्रिया वेगवान करण्याची ताकद जिरा पाण्यात असते. त्याशिवाय जिरा पाणी त्वचेलाही उत्तम असते. त्वचेचे अनेक विकार जिरा पाण्यामुळे दुरुस्त होतात. जिरा पाणी तयार करण्यासाठी एक लिटर पाणी घ्या आणि त्यात २ चमचे जिरे टाकून चार ते पाच मिनिटे उकळवा. उकळल्याने पाण्याचा रंग बदलतो. हे पाणी काही वेळ थंड होऊ द्या. ते एका बाटलीत साठवून ठेवा आणि दिवसभरात जमेल तसे प्या. जिरा पाणी फार थंड करू नये. हे जिरा पाणी तयार करण्यासाठी कच्चे जिरे वापरावे. भाजलेले जिरे वापरू नये. त्यातल्या त्यात पूर्ण जिरे वापरावे. जिरा पावडर वापरू नये. दररोज स्वतंत्र जिरा पाणी तयार करावे. एक दिवस तयार केलेले जिरा पाणी दुसऱ्या दिवशी वापरू नये.



# चाळिशीतल्या चालीवरून तुमचं म्हातारपण कसं असेल हे कळणार?

**वयाच्या चाळिशीत असताना लोक कसे चालतात त्यावरून त्यांचा मेंदू आणि शरीर किती म्हातारं झालं आहे, हे कळू शकतं. शास्त्रज्ञ यासंबंधी संशोधन करत आहेत. चालण्याच्या गतीची एक साधी चाचणी घेऊन शास्त्रज्ञ म्हातारे होत जाण्याची प्रक्रिया जाणून घेऊ शकतात. संथपणे चालणाऱ्या लोकांचं शरीर लवकर म्हातारं होतंच, त्यासोबत त्यांचा चेहरा वयस्कर दिसू लागतो आणि त्यांच्या मेंदूचा आकारही लहान असल्याचं संशोधनातून निष्पन्न झालं आहे. हे एक आश्चर्यकारक संशोधन असल्याचं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे.**



**साधारणपणे** वयाच्या पासष्टीनंतर सर्वांगीण आरोग्य तपासण्यासाठी डॉक्टर चालण्याची गती तपासत असतात. कारण चालण्यातून स्नायूंची बळकटी, फुफ्फुसाची कार्यक्षमता, संतुलन, मणक्याची मजबुती तसंच दृष्टी या सर्वांबद्दलच योग्य अंदाज येतो. वृद्धत्वाकडे झुकलेले असताना संथपणे चालणाऱ्या व्यक्तींना स्मृतिभ्रंश होण्याची शक्यताही जास्त असते.

**समस्येचे संकेतदर्शक**

न्यूझीलंडमध्ये याबाबत एक अभ्यास करण्यात आला. यामध्ये ७० च्या दशकात जन्मलेल्या म्हणजेच आता साधारणपणे ४५ वर्षे वय असलेल्या व्यक्तींच्या चालण्याची तपासणी करण्यात आली. अभ्यासात सहभागी झालेल्या व्यक्तींची शारीरिक क्षमता तसंच मेंदूची कार्यक्षमताही बारकाईने तपासण्यात आली होती. लहानपणापासून या व्यक्तींची दोन वर्षांतून एकदा आकलन आणि बुद्ध्यांक चाचणीही करण्यात आली होती. संथ चाल हे म्हातारपणी येऊ शकणाऱ्या समस्यांचे संकेत जवळपास दहा वर्षे आधीच देत असल्याचं अभ्यासातून दिसून आलं, अशी माहिती प्रा. टेरी ई. मॉफिट यांनी दिली. मॉफिट हे लंडनच्या किंग्ज कॉलेज ऑफ लंडन तसंच अमेरिकेतल्या ड्यूक युनिव्हर्सिटीतील प्रमुख लेखक आहेत. ४५ वर्षे वयात चालण्याच्या वेगात बराच फरक पाहायला मिळतो. न धावता जास्तीत जास्त ४ मीटर/सेकंद इतक्या वेगाने चालता येऊ शकतं. संथपणे चालणाऱ्या व्यक्तींमध्ये वय वेगानं वाढण्यासोबतच फुफ्फुस, दातांच्या समस्या आणि क्षीण रोगप्रतिकारकशक्ती ही लक्षणं वेगानं चालणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत अधिक दिसून आली. सर्वात अनपेक्षित गोष्ट म्हणजे, मेंदूचं बारकाईने निरीक्षण केलं असता संथ चाल असलेल्या व्यक्तींचा मेंदू जास्त वयाचा दिसत असल्याचं संशोधनात आढळलं. मुलं तीन वर्षांची असल्यापासूनच बुद्धिमत्ता, भाषा आणि मुलांच्या हालचाली तसंच वाढीची क्षमता यांची चाचणी घेतल्यास वयाच्या ४५ व्या वर्षी त्याची चाल कशी असेल याचा अंदाज लावता येऊ शकतो, असं संशोधनात सिद्ध झालं आहे. संथ चालीसह मोठे होणाऱ्या मुलांचा (१.२ मीटर/सेकंद) बुद्ध्यांक वेगवान चाल असणाऱ्या मुलांच्या (१.७ मीटर/सेकंद) बुद्ध्यांकापेक्षा १२ गुणांनी कमी असल्याचं ४० वर्षांनंतर आढळून येतं.

## जीवनशैलीशी संबंध

■ संशोधकांच्या आंतरराष्ट्रीय समूहाने जामा नेटवर्क ओपनमध्ये याविषयी लिहिलं आहे. आरोग्य आणि बुद्ध्यांक यामधला फरक आपल्या जीवनशैलीशी संबंधित असू शकतो किंवा अगदी सुरुवातीला असलेलं उत्तम आरोग्य या बाबींशी संबंधित असू शकतं, असा यामध्ये उल्लेख आहे. ■ आपल्याला उत्तम आरोग्य लाभणार की नाही याचे संकेत हे खूप आधीपासूनच मिळत असल्याचं संशोधक स्पष्ट करतात. ■ तरुण वयातील चालण्याचा वेग मोजणं हा आपलं म्हातारपण तपासण्यासाठीचा एक मार्ग असू शकतो, असं संशोधकांनी सांगितलं आहे. ■ हलकं जेवण घेण्यापासून ते मेटमॉर्फिन औषधापर्यंत विविध उपचारांचा शोध सध्या घेतला जात आहे. ■ आपल्या आरोग्याबाबत मेंदू आणि शरीराचे काही संकेत असतात. तरुण आणि निरोगी राहण्यासाठी आपल्या जीवनशैलीत बदल केल्यास उत्तम आयुष्य जगता येऊ शकतं, असं शास्त्रज्ञांनी स्पष्ट केलं आहे.

# अक्षय कुमार आणि अर्शद वारसी यांच्यामध्ये 'जॉली एल. एल. बी'वरुन जुंपली




बॉलिवूडचे लोकप्रिय अभिनेते अक्षय कुमार आणि अर्शद वारसी यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतो आहे. दोघांमध्ये एका महत्त्वाच्या विषयावरुन वाद झालेला पाहायला मिळतो आहे, या व्हिडिओत दिग्दर्शक-अभिनेते सौरभ शुक्लाही दिसत आहेत. वाचा या अभिनेत्यांमध्ये कशावरुन वाद झाला आहे. तर अक्षय आणि अर्शद या दोन्ही कलाकारांनी त्यांचा आगामी सिनेमा 'जॉली एल. एल. बी ३'च्या शूटिंगला सुरुवात केली असून खरा जॉली कोण यावरुन त्यांचा वाद झाला आहे. 'जॉली एल. एल. बी' आणि 'जॉली एल. एल.बी. २' या सिनेमांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले होते. पहिल्या सिनेमात अभिनेता अर्शद वारसी जगदीश त्यागी उर्फ जॉली या भूमिकेत होता, तर दुसऱ्या सिनेमात अक्षय कुमार जगदीश्वर मिश्रा उर्फ जॉली या भूमिकेत होता. आता खरा कोण आणि बनावट कोण, असा सवाल करणारा हा प्रमोशनल व्हिडिओ आहे.

जेव्हापासून 'जॉली एल. एल. बी' ३साठी अक्षय आणि अर्शद एकत्र काम करणार आहेत, हे समोर आले आहे तेव्हापासून प्रेक्षकांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. आता त्यांनी खरा जॉली कोण आणि खोटो कोण, असा सवाल करत प्रेक्षकांची उत्सुकता अधिक ताणून धरली आहे. त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओत दोघेही वकिलाच्या भूमिकेत दिसत आहेत, दोघेही स्वतःला खला जॉली तर दुसरा बनावट असल्याचे ठामपणे सांगत आहेत.

अक्षयने व्हिडिओ शेअर करताना असे कॅप्शन दिले आहे की, 'आता ओरिजिनल कोण आणि डुप्लिकेट कोण हे तर माहीत नाही, पण हा प्रवास खूप जॉली असणार आहे हे मात्र नक्की. आमच्यासोबत राहा, जय महाकाल!' व्हिडिओमध्ये अर्शद असे म्हणतो की, 'जगदीश त्यागी, बीए एल. एल.बी.... डुप्लिकेटपासून सावधान'. तर अक्षय म्हणतो की, 'जगदीश्वर मिश्रा, बीए एल. एल. बी.... ओरिजनल जॉली, लखनऊ वाले'. तर शेवटी सौरभ शुक्ला यांच्या हातात एक पाटी दाखवण्यात आली आणि त्यावर असे लिहिले आहे की, 'जॉली एल. एल. बी. ३ च्या शूटिंगला सुरुवात'.

'जॉली एल. एल. बी' सिनेमाचे पहिले दोन भाग दिग्दर्शक सुभाष कपूर यांनी दिग्दर्शित केले होते, तेच तिसऱ्या भागाचेही दिग्दर्शन करणार आहेत. पुढील वर्षी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ७२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 2 | | 9 | | | |
| 8 | 4 | 7 | 1 | 3 | | 2 | | |
| | 9 | | | | | | | 4 |
| | | | | | 6 | 5 | | 8 |
| 4 | 1 | | | | | | | |
| | 7 | | 3 | | | | | |
| 2 | | | | 6 | | 7 | 9 | |
| | | 1 | 4 | | | 3 | | |
| 3 | 8 | | | 7 | | | 2 | |

## उत्तर सुडोकू -७१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 4 | 9 | 5 | 2 | 1 | 8 | 3 |
| 3 | 2 | 1 | 4 | 8 | 6 | 9 | 5 | 7 |
| 5 | 8 | 9 | 1 | 7 | 3 | 2 | 4 | 6 |
| 8 | 3 | 5 | 2 | 6 | 1 | 7 | 9 | 4 |
| 9 | 6 | 2 | 7 | 4 | 5 | 3 | 1 | 8 |
| 4 | 1 | 7 | 8 | 3 | 9 | 5 | 6 | 2 |
| 7 | 9 | 6 | 3 | 1 | 8 | 4 | 2 | 5 |
| 1 | 4 | 8 | 5 | 2 | 7 | 6 | 3 | 9 |
| 2 | 5 | 3 | 6 | 9 | 4 | 8 | 7 | 1 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# ट्रोलर्ससाठी ऐश्वर्या नारकर यांनी शेअर केला खास व्हिडीओ, नेटकरी म्हणाले...



अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी चित्रपट, मालिका, नाटक अशा तिन्ही माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. आजवर त्यांनी अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलं आहे. सध्या झी मराठी वाहिनीवरील 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेत त्या खलनायिकेची भूमिका साकारत आहेत.

ऐश्वर्या नारकर समाजमाध्यमांवर कायम सक्रिय असतात. अनेकदा सेटवरच्या मेकअप रूममधली धम्माल-मस्ती, सहकलाकारांबरोबरचे डान्स व्हिडीओ त्या समाजमाध्यमावर शेअर करीत असतात. असाच एक व्हिडीओ त्यांनी नुकताच समाजमाध्यमांवर शेअर केला आहे.सध्या 'माझ्याशी नीट बोलायचं' हे गाणं समाजमाध्यमावर तुफान व्हायरल होतंय. खरं तर 'भाडीपा'चं हे गाणं दोन वर्षांपूर्वीच प्रदर्शित झालंय; पण आता ते व्हायरल होतंय. या गाण्यावर अनेक कलाकार आणि इन्फ्लुएन्सर्सनी रील्स केल्या आहेत. मिताली मयेकर, संदीप पाठक, तितीक्षा तावडे अशा अनेक मराठी कलाकारांनी हा ट्रेंड फॉलो केला आहे. प्रत्येक ट्रेंड फॉलो करणाऱ्या अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनीदेखील हा ट्रेंड फॉलो केला आहे.

ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. 'हा व्हिडीओ सर्व ट्रोलर्ससाठी', असं त्यांनी या व्हिडीओवर लिहिलंय. ऐश्वर्या नारकर यांचा हा व्हिडीओ समाजमाध्यमावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हिडीओवर चाहत्यांच्या भरभरून प्रतिक्रिया आल्या आहेत. ''हो! नीटच बोलणार तुमच्याशी'' अशी कमेंट एका चाहत्याने केली. त्यात तुम्ही खूप गोड दिसताय. ''तथ्य आणि मजा'', अशी कॅप्शन त्यांनी या व्हिडीओला दिली आहे.

दरम्यान, ऐश्वर्या नारकर यांच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर झी मराठी वाहिनीवरील 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेत ऐश्वर्या नारकर खलनायिकेची भूमिका साकारत आहेत. ही मालिका आता रंजक वळणावर येऊन पोहोचली आहे. या मालिकेत तितीक्षा तावडे नायिकेची भूमिका साकारत आहे; तर अजिंक्य ननावरे, श्वेता मेहेंदळे, राहुल मेहेंदळे, जयंत घाटे यांच्याही यात निर्णायक भूमिका आहेत.

## दिनविशेष

### ३ मे

- ◆१७१५: संपूर्ण सूर्यग्रहण उत्तर युरोप आणि उत्तर आशिया मध्ये दिसले.
- ◆१८०२: वॉशिंग्टन (डीसी) या शहराची स्थापना झाली.
- ◆१९१३: दादासाहेब फाळके यांचा राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय मूक चित्रपट प्रदर्शित झाला.
- ◆१९३९: नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.
- ◆१९४७: इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (व्हळवड) ची स्थापना झाली.
- ◆१९७३: शिकागो येथील १४५१ फूट उंच आणि १०८ माजले असलेली सिअर्स टॉवर ही (त्या काळची) जगातील सर्वात उंच इमारत बनली.
- ◆१९९४: सर्व वंशाच्या नागरिकांना मताधिकार असलेल्या दक्षिण अफ्रिकेच्या पहिल्याच निवडणूकीत विद्यमान अध्यक्ष एफ. डब्ल्यू. डी. कर्क यांच्या पक्षाचा पराभव झाला. नेल्सन मंडेला यांच्या नेतृत्त्वाखालील अफ्रिकन नॅशनल काँग्रेस या पक्षाला बहुमत मिळाले. तोपर्यंत दक्षिण
- ◆१९९९: एडविन जस्कुलस्की या ९६ वर्षीय गृहस्थाने १०० मी. धावण्याची शर्यत २४.०४ सेकंदांत पूर्ण करण्याचा जागतिक विक्रम केला.
- ◆१८१८: चित्रपट महर्षी भालजी पेंढारकर यांचा जन्म.
- ◆१८९६: भारताचे संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्ण मेनन यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १९७४)
- ◆१८९८: : शिक्षिका आणि इस्त्रायलच्या चौथ्या पंतप्रधान गोल्डा मायर यांचा जन्म. (मृत्यू: ८ डिसेंबर १९७८)
- ◆१९५१: राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांचा जन्म.
- ◆१९५९: भाजपाच्या जेष्ठ नेत्या उमा भारती यांचा जन्म.
- ◆१९१२: उर्दू कादंबरीचे जनक मानले जाणारे उर्दू लेखक, समाजसुधारक नझीर अहमद देहलवी ऊर्फ डिप्टी यांचे निधन.
- ◆१९६९: भारताचे तिसरे राष्टपती, शिक्षणतज्ञ पद्मविभूषण व भारतरत्न डॉ. झाकीर हुसेन यांचे निधन. (जन्म: ८ फेब्रुवारी १८९७)
- ◆१९७१: प्रसिध्द अर्थशास्त्र धनंजय रामचंद्र गाडगीळ यांचे निधन. (जन्म: १० एप्रिल १९०१)
- ◆१९७७: मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे अध्वर्यू हमीद दलवाई यांचे निधन. (जन्म: २९ सप्टेंबर १९३२)
- ◆१९७८: लेखक, कवी व शिक्षणतज्ञ विठ्ठल दत्तात्रय घाटे यांचे पुणे येथे निधन. (जन्म: १७ जानेवारी १८९५ - घोसपुरी, अहमदनगर)
- ◆१९८१: हिंदी चित्रपट अभिनेत्री फातिमा रशीद ऊर्फ नर्गिस यांचे निधन. (जन्म: १ जून १९२९)
- ◆१९९६: व्यंगचित्रकार वसंत गवाणकर यांचे निधन.
- ◆२०००: जेष्ठ समाजसेविका शकुंतलाबाई परांजपे यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९०६)
- ◆२००६: भाजपाचे जेष्ठ नेते, केंद्रीय मंत्री आणि राज्यसभा खासदार प्रमोद महाजन यांचे निधन. (जन्म: ३० ऑक्टोबर १९४९)
- ◆२००९: जेष्ठ साहित्यिक राम बाळकृष्ण शेवाळकर यांचे निधन. (जन्म: २ मार्च १९३१)
- ◆२०११: गीतकार कवी जगदीश खेबुडकर यांचे निधन. (जन्म: १० मे १९३२)

## भविष्य

**मेष** कौटुंबिक सौख्यात रमाल. गरज नसतांना प्रवास करावा लागू शकतो. लहान मुलांच्यात रमून जाल. व्यावसायिक बदल लक्षात घ्यावेत.

**वृषभ** ऐक्याची भावना जोपासाल. दिवस मनाप्रमाणे व्यतीत कराल. थोरांशी सल्ला-मसलत कराल. कामात चंचलता येईल.

**मिथुन** मोकळेपणाने बोलणे टाळाल. पत्नीचा प्रेमळ सहवास मिळेल. झोपेची तक्रार दूर होईल. संसर्गजन्य आजारांपासून काळजी घ्यावी.

**कर्क** उगाचच चंचलता वाढेल. फार विचार करत बसू नका. मनातील इच्छेला अधिक महत्व द्याल. जोडीदाराचा हट्ट पुरा कराल. जुने विचार मनातून काढून टाकावेत.

**सिंह** कलेसाठी अधिक वेळ काढाल. सर्वांच्या कौतुकास पात्र व्हाल. कामात स्थिरता ठेवावी. गप्पांमध्ये वेळ घालवाल. पोटाची काळजी घ्यावी. हातातील कामात यश येईल.

**कन्या** कामात जोडीदाराचा हातभार लागेल. प्रगतीची नवीन संधी उपलब्ध होईल. मुलांना नवीन गोष्टी शिकवाल. व्यायामाचे महत्व लक्षात घ्यावे. अपचनाचा त्रास जाणवेल.

**तुला** काही कामे कमी श्रमात पार पडतील. घरातील वातावरण अस्वस्थ वाटू शकते. नवीन गोष्टी आमलात आणताना विचार करावा. अचानक धनलाभ संभवतो. धार्मिक ग्रंथांचे वाचन करावे.

**वृश्चिक** गरज नसेल तर प्रवास टाळावा. जोडीदाराचे सौख्य वाढेल. नवीन गोष्टींकडे कल वाढेल. मोहाळा बळी पडू नका. जवळचे मित्र भेटतील. भावंडांचे प्रश्न सामोरी येतील.

**धनु** कौटुंबिक स्वास्थ्याला प्राधान्य द्यावे. नवीन लोकांशी संपर्क वाढेल. कामाचा आनंद घ्याल. लोकोपवादाला बळी पडू नका. जुन्या कामात प्रगती कराल. धैर्याने कामे हाती घ्याल.

**मकर** मानसिक ताण जाणवू शकतो. सतत बडबड कराल. कमिशनचा विचार आधी कराल. आवडते पुस्तक वाचाल. रागावर नियंत्रण ठेवावे. कामात आळस आड येऊ शकतो.

**कुंभ** तुमच्या स्मरणशक्तीचे कौतुक केले जाईल. घरातील साफसफाई कराल. काही सकारात्मक बदल कराल. आवडता छंद जोपासाल. सामुदायिक गोष्टीत लक्ष घालू नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

**मीन** उगाचच थकवा जाणवेल. सकारात्मक विचार करावेत. हस्तकलेत मन रमवावे. लबाड लोकांचा संग टाळावा. खोट्याचा आधार घेऊ नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# मुद्दे नसलेला प्रचार!

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे आतापर्यंत दोन टप्पे झाले आहेत. मतदानाचे अजून पाच टप्पे शिल्लक आहेत. प्रचार जोरात सुरू आहे. अगदी रणरणत्या उन्हातून उमेदवार आणि त्यांचे राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील नेते प्रचार करत आहेत. नेहमीप्रमाणे आश्वासनांची खैरात वाटली जात आहे. देशाच्या विकासाचे मुद्दे मांडले जात आहेत. देशात एनडीए विरुद्ध इंडिया आघाडी आणि राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात निवडणुकीच्या कुरुक्षेत्रावर युद्धाला तोंड फुटले आहे. दोन्ही बाजूंनी जनतेच्या नावाने मुद्दे मांडले जात असल्याचे दावे केले जात असले तरी यात जनतेचे नक्की स्थान कुठे आहे, हाच मुद्दा महत्त्वाचा आहे. लोकांना हे हवे, लोकांना ते हवे, असे नेते-उमेदवार सांगत आहेत, पण लोकांना नक्की काय हवे हे खरेच या राजकीय पक्षांना, त्यांच्या नेत्यांना आणि उमेदवारांना माहीत आहे का, हा महत्त्वाचा सवाल आज देशातील जनता विचारत आहे. मुळात या नेत्यांचा जनतेशी, मतदारांशी संवाद आहे का, हाच खरा प्रश्न आहे. एकतर्फी भाषणे देऊन, जनतेतून हो, नाही, अशी उत्तरे मिळवणार्यांना लोकांचे खरे प्रश्न समजलेच नाहीत. आज सर्वसामान्यांचा महत्त्वाचा मुद्दा आहे तो जगायचे कसे याचा. ऐन उन्हाळ्यात महाराष्ट्रात पाण्याची बोंबाबोंब आहे. पाणीटंचाईने जनता मेटाकुटीला आली आहे. महिलांना डोक्यावर हंडा घेऊन वणवण फिरावे लागत आहे. जलजीवन मिशनच्या योजनांना भ्रष्टाचाराची गळती लागली आहे. ही गळती कशी थांबवणार याचे उत्तर कोणी देत नाही. गरिबांच्या मुलांनी आरटीई अंतर्गत शिकायचे म्हटले तरी त्यांच्या मुलांसाठी यापूर्वी असलेले खासगी शाळांचे पर्याय काढून टाकल्याच्या तक्रारी पालक करत आहेत. जिल्हा परिषदेच्या किंवा सरकारी शाळेतच प्रवेश घ्यायचा तर त्यासाठी आरटीईची गरज काय, असा सवाल पालक विचारत आहेत. हजार रुपयांच्या घरात गेलेला घरगुती गॅस, इंधनाच्या दराने दोन वर्षांपूर्वीच पार केलेली शंभरी हे सर्व घराघरातील प्रश्न आहेत. बेकारीचा विषय एव्हरग्रीन आहे. दरवर्षी रस्त्यांत खड्डे का पडतात? धान्याच्या हमीभावासाठी शेतकऱ्यांचा आजही संघर्ष का सुरू आहे? गुन्हेगारीला ब्रेक केव्हा लागणार? १४ वर्षांनंतरही मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण का होऊ शकले नाही? या प्रश्नांची उत्तरे कोण देणार? राज्यासह देशात सध्या कांदा निर्यातबंदीचा विषय खूप गंभीर आहे. राज्यातील हजारो कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा हा प्रश्न आहे. याबाबत आजही संभ्रमाचे वातावरण असेल तर ही चिंतेची बाब आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या केव्हा थांबणार, या सर्व प्रश्नांची उत्तरे टाळून विकासाची चर्चा होणार असेल तर सारे व्यर्थ म्हणावे लागेल. जनतेचे शेकडो प्रश्न आहेत. आजही जगण्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना अडचणींचा डोंगर पार करावा लागत असेल आणि यावर काहीही न बोलता केवळ भटकता आत्मा, औरंगजेब, धर्म-जात-पंथ, एकमेकांना शिव्या, आरोप-प्रत्यारोप, एकमेकांची हिंमत काढणे, उणीधुणी काढणे, समोरचा किती वाईट आहे हेच प्रचाराचे मुद्दे असतील तर नक्की कीव कुणाची करायची? आज प्रचारासाठी उन्हातान्हात सभा घेणारे, ज्येष्ठ नागरिक दिसताच त्यांच्या पाया पडणारे उमेदवार निवडणूक संपल्यानंतर त्या मतदारसंघात फिरकतात का, हा संशोधनाचा विषय आहे. अनेक उमेदवार खासदार झाल्यानंतर पाच वर्षांत मतदारांना तोंडही दाखवत नाहीत. प्रचार करताना खुल्या गाडीतून सर्वांना नमस्कार करणारे उमेदवार खासदार झाल्यानंतर तोंडही दाखवत नाहीत हा जनतेचा अनुभव आहे. एवढेच कशाला प्रश्नांची उकल व्हावी म्हणून नंतर याच मतदारांना खासदारांचे घर किंवा त्यांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. एक दिवसाचा मतदार 'राजा' नंतर पाच वर्षे 'गुलाम' होतो, हेच वास्तव आहे.ही परिस्थिती बदलण्याची ताकद खरंच मतदारांमध्ये आहे का? याचे उत्तर प्रत्येकाने आपल्याकडे शोधायचे आहे. मी मतदान करणार, हा निर्धार प्रत्येक मतदाराने करायला हवा! एवढेच नाही तर आपण ज्याला मतदान करणार तो उमेदवार खरंच योग्य आहे की भ्रष्टाचारी आहे, गुन्हेगारी वृत्तीचा आहे, याचा अभ्यास मतदारांनी करायलाच हवा. खासदाराचे कार्यक्षेत्र संसद असते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा, अनुभवाचा, बुद्धीचा आणि चातुर्याचा उपयोग देशासाठी व्हायला हवा! संरक्षण क्षेत्र, आर्थिक धोरणे, परराष्ट्र धोरण, उद्योगांबाबतची धोरणे, कृषी सुधारणा आदींचा अभ्यास करण्याची कुवत असलेल्या व्यक्तीचा यासाठी विचार करायला हवा, हे मतदारांनी लक्षात घ्यायला हवे. आपल्या मतदारसंघात शौचालय बांधणे, गटाराची कामे करणे, कचरा उचलणे ही कामे खासदारांची नाहीत याचेही भान मतदारांनी राखले पाहिजे. जी कामे ग्रामपंचायतीने, नगरपालिका तसेच महापालिकेने करायची असतात ती कामे आपण खासदारांकडून गृहीत धरतो हे योग्य नाही हे मतदारांनीही लक्षात घ्यायला हवे. नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, आमदार आणि खासदारांची कामे वेगवेगळी असतात. याचे भान राखून कोणत्या टप्प्यावर कुणाला मतदान करावे याची जाणीव मतदारांना हवी. असे म्हणतात, यथा राजा तथा प्रजा! म्हणूनच कुठल्याही लोभाला बळी न पडता मतदान केले तर भविष्यात जनतेची कामे होतील अन्यथा तुमच्या मताची किंमत आम्ही दिली, आता तुम्हाला बोलायचा अधिकार नाही, असे भविष्यात ऐकावे लागू शकते. म्हणूनच मतदार राजा आतातरी जागा हो!

# सावधान...! भारतीय लोकशाहीत पेड न्यूजला थारा नाही...!

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने दि.१६ मार्च २०२४ ''आदर्श आचार संहिता'' जाहीर केली आहे. लोकसभेत योग्य, कार्यक्षम व लोकाभिमुख दृष्टिकोन असलेला लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी प्रत्येक भारतीय मतदाराने मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येते. मतदान करणे, हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याने मतदारांनी कुठल्याही आमिषाला वा प्रलोभनाला बळी पडू नये. तसेच धाकदपटशाहीला भीक न घालता मतदारांनी सद्सद्विवेकबुद्धीने मतदान करावे. महत्वाचे म्हणजे निवडणुका मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पडाव्यात, यासाठी सर्वपक्षीय उमेदवारांनी अन् प्रसारमाध्यमांनी सहकार्य करावे, असे निवडणूक आयोगाकडून आवाहन करण्यात आले आहे. मागील काही सार्वत्रिक निवडणुकींचे सिंहावलोकन केल्यावर देशात काही ठिकाणी पेड न्यूज च्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. खरे तर, अशा घटना लोकशाहीला मारक आहेत. त्याचप्रमाणे पेड न्यूज हे मुक्त व शोधपत्रकारितेलाही बाधक आहे. यास्तव वृत्तपत्रे अन् त्यांच्या प्रतिनिधींनी ''पेड न्यूज'' ला अजिबात थारा देऊ नये. सर्वात महत्वाचे म्हणजे सुदृढ लोकशाहीसाठी उमेदवारांनीदेखील आपल्या प्रचार मोहिमेदरम्यान पेड न्यूजचा आधार घेवू नये. कारण पेड न्यूज हा लोकशाही संवर्धनाच्या मागार्तील मोठा अडसर आहे, हे लक्षात घ्यावे. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पेड न्यूजसंदर्भात केलेली व्याख्या ₹एखाद्या उमेदवाराने पैशाच्या मोबदल्यात किंवा विशेष मेहरनजरेच्या बदल्यात प्रसिद्धी माध्यमाद्वारे केलेली बातमी, वृत्तांकन, विश्लेषण वा प्रसारण₹ अशी आहे. असे कृत्य केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्या संबंधीत प्रसारमाध्यम, वृत्तपत्र आणि उमेदवाराच्या लोकप्रियतेला तडा जावून जनमानसातील विश्वासाहर्ता नाहीशी होत असते. म्हणजेच एखाद्या उमेदवाराने, राजकीय पक्षाने वा त्याच्या संघटना किंवा संस्थेने मतदारांना प्रभावित करण्याच्या हेतूने वर्तमानपत्रे, सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया ( विभिन्न चॅनल्स) यांच्याद्वारे सोयीनुसार बातम्या प्रसिद्ध-प्रसारित करणे, हे सर्व प्रकारे पेड न्यूजच्या कक्षेत येतात, हे उमेदवार व माध्यमांनी जरूर लक्षात घ्यावे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे वृत्तांकनाच्या (दृकश्राव्य) बदल्यात घेतलेला पैसा वा भेटवस्तू याला ''भ्रष्टाचाराचे कृत्य'' म्हणून घोषित केल्याने, तो आता शिक्षापात्र अपराध आहे. म्हणूनच पेड न्यूजसारख्या गैरप्रकारांना प्रसारमाध्यमांनी स्वतःहूनच मज्जाव करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. उमेदवारांनी प्रचार मोहिमेत केलेल्या खर्चाचा अचूक लेखा ठेवून, त्याचे विवरणपत्र संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे तसेच खर्च नियंत्रण समितीच्या नोडल अधिकाऱ्यांकडे सादर करणे, निवडणूक आयोगाने अनिवार्य केले आहे. त्यात कसूर करणे हाही एक अपराधच आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे तर ₹पेड न्यूज₹ हा निकोप पत्रकारितेची संभाव्य कीड आहे. यासाठी पत्रकारांनीच पुढाकार घेवून ₹पेड न्यूज₹ या अनैतिक बाबीला अस्वीकृत करून हद्दपार करायला हवे. वृत्तपत्रे व दूरचित्रवाहिन्यांनी पत्रकारितेची मूल्ये शिरसावंद्य मानून, लोकशाहीची बूज राखायला हवी. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी हे लोकशाहीचे पाईक असल्याने, त्यांनी पत्रकारिता क्षेत्रातून पेडन्यूजला हद्दपार करण्यास कटिबद्ध व्हावे. घटनाकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटना अन् भारतीय लोकशाहीचा जगाच्या पाठीवर सर्वत्र नावलौकिक आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील सर्वपक्षीय उमेदवार, त्यांचे पदाधिकारी आणि प्रसारमाध्यमे (प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमे) या सर्वांनी योग्य ती खबरदारी घेऊन लोकशाहीला मारक असलेल्या पेड न्यूजचा मार्ग अवलंबू नये, असे कळकळीचे आवाहन करण्यात येत आहे. आपण अशा प्रकारे कर्तव्यपूर्ती केल्यामुळे भारतीय लोकशाही जागतिक स्तरावर सदैव आदर्श लोकशाही म्हणून गणली जाईल, हे निश्चित!

**◆मनोज सुमन शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे◆ तथा नोडल अधिकारी, एकत्रित मीडिया कक्ष आणि सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, ठाणे.**

# 'आरटीई' मूळ हेतूसह 'पुन्हा येईल?'




शिक्षण हक्क कायद्याच्या (आरटीई) मूळ हेतूलाच धक्का पोचत असल्याचा विषय 'पुन्हा एकदा' चर्चेला आला आहे. 'पुन्हा एकदा' म्हणण्याचे कारण असे, की गेला काही काळ या विषयावर मोठी ओरड होऊनही सरकारी स्तरावर त्याची काहीच दखल घेतली गेलेली नाही. फेब्रुवारीमध्ये राज्य सरकारने 'आरटीई'च्या नियमांत एक कळीचा बदल केला. आता 'आरटीई'अंतर्गत असलेल्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशअर्ज प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना, उपलब्ध जागांच्या तुलनेत अत्यल्प अर्ज आल्याने हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या विषयाची थोडी पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. 'आरटीइ'अंतर्गत वंचित वगार्तील मुलांसाठी खासगी, विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसाहाय्यित शाळांत २५ टक्के जागा राखीव असतात. त्यांचे शुल्क सरकार भरते. यंदा राज्य सरकारने हा नियम थोडासा वळवला. हा नियमबदल असे सांगतो, की ज्या खासगी, विनाअनुदानित वा स्वयंअर्थसाहाय्यित शाळांच्या एक किलोमीटर अंतराच्या परिसरात सरकारी किंवा अनुदानित शाळा असतील, त्या शाळांना 'आरटीई'अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे बंधन नसेल. सोप्या भाषेत सांगायचे, तर एखाद्या खासगी शाळेच्या एक किलोमीटर परिसरात कोणतीही सरकारी वा अनुदानित शाळा असेल, तर २५ टक्के कोटयातील विद्यार्थ्यांला त्या सरकारी वा अनुदानित शाळेत प्रवेश घ्यावा लागेल. राज्यातील शहरांत असलेल्या शाळांचा विचार केला, तर खासगी आणि सरकारी शाळांत एक किलोमीटरपेक्षा जास्त अंतर आहे, अशी स्थिती फार कमी ठिकाणी असेल. थोडक्यात २५ टक्के कोटयातील प्रवेशांसाठी एक प्रकारे खासगी शाळांची दारे बंदच करण्यात आहेत. पालकांच्या हे लक्षात आल्यानेच यंदा १५ ते ३० एप्रिल या कालावधीत २५ टक्के कोटयासाठी ६० हजार अर्जच आले आहेत. गेल्या वर्षी ही संख्या चार लाखांच्या घरात होती. आता हे प्रकरण न्यायालयात गेले असून, मुळात हा नियमबदल शिक्षण हक्क कायद्याच्या विपरीत असल्याने रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयात याबाबत तीन ते चार याचिका दाखल झाल्या आहेत. त्यावरील सुनावणीदरम्यानच राज्य सरकारने आरटीई कोटयातील प्रवेशांसाठी अर्ज करण्याची मुदत ३० एप्रिलवरून १० मेपर्यंत वाढवत असल्याचे सांगितले आहे. या प्रश्नाची एक बाजू अशी, की गेल्या काही वर्षांत 'आरटीई'च्या २५ टक्के कोटयांतर्गत खासगी शाळांत जे प्रवेश झाले, त्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती सरकारने केलेली नाही. खासगी शाळांचे अर्थकारणच कोलमडल्याने त्यांनी याबाबत तीव्र नाराजी दर्शवली होती. मग राज्य सरकारने आपल्या डोक्यावरचे शुल्क प्रतिपूतीर्चे 'ओझे' उतरविण्यासाठी या नियमबदलाची पळवाट काढली. वरवर हा तात्पुरता इलाज वाटला, तरी त्याचे परिणाम दीर्घकालीन आहेत. शिक्षण हक्क कायद्याने ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार दिला आहे. पैशांअभावी शिक्षण अडू नये हा त्यामागील व्यापक हेतू. त्याचबरोबर वंचित वगार्ला २५ टक्के आरक्षणाद्वारे महागडया खासगी शाळांतही प्रवेश शक्य होऊन त्यायोगे तेथील दर्जेदार शिक्षण व सुविधा मिळाव्यात, हा त्यातील आणखी एक हेतू. शिवाय या खासगी शाळांत शिकणारी उच्च वगार्तील मुले आणि वंचित वर्गातील मुले यांच्यातील भेद पुसला जावा, असा व्यापक सामाजिक सामीलकीचा उद्देशही या सगळयामागे होता. राज्य सरकारच्या नियमबदलाने मात्र या सगळयाच उद्दिष्टांना हरताळ फासला जात आहे. वास्तविक शिक्षण ही सरकारची जबाबदारी असायला हवी, पण हा संवेदनशील विषय सरकारनेच 'ऑप्शन'ला टाकला आहे. शिवाय, पाल्याला खासगी शाळांत घालणाऱ्या अनेक पालकांनाही २५ टक्के कोटयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या पाल्याबरोबर शिकणे मान्य नाही. 'आम्ही एवढे पैसे भरायचे आणि हे फुकट शिकणार,' असा त्यातला आव आहे, त्यामागील सामाजिक उद्दिष्टांचे मात्र भान नाही. बरे, नियमबदल खासगी शाळांना अनुकूल करण्यामागे पालक या घटकाबरोबरच खासगी शाळा चालविणाऱ्या संस्थांमागच्या राजकीय प्रेरणाही आहेतच. अनेक खासगी शिक्षण संस्था प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कोणाच्या मालकीच्या आहेत, हे नव्याने सांगायची गरज नाही. यात सत्ताधारी आणि विरोधक दोघेही एकाच बाजूला असल्याने तो निवडणुकीतील मुद्दा होईल, अशी भाबडी आशा सामान्याने न केलेलीच बरी. शिक्षणातील खासगीकरणाने निर्माण केलेला हा नवा वर्गवाद जोमाने फोफावत असताना, ती दरी भरून काढण्याची संधी आपण शिक्षण हक्क कायद्यातील एका नियमबदलाने गमावून बसलो आहोत, हे मात्र खरे. शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी न्यायालयात दाद मागून याला वाचा फोडली आहे, इतकाच काय तो दिलासा. बाकी 'आरटीई' मूळ हेतूसह 'पुन्हा येईल', अशी आशा करत राहायचे.

# CBI not under control of Union of India, Centre tells SC on West Bengal govt's suit




**NEW DELHI :** The CBI is not under the "control" of the Union, the Centre on Thursday told the Supreme Court while raising preliminary objections on a lawsuit filed by the West Bengal government on the agency going ahead with its probe in several cases without the prerequisite nod from the state.

The West Bengal government has filed an original suit in the apex court against the Centre under Article 131 of the Constitution, alleging that the CBI has been filing FIRs and proceeding with its investigation, despite the state having withdrawn the general consent to the federal agency to probe cases within its territorial jurisdiction.

Article 131 deals with the Supreme Court's original jurisdiction in a dispute between the Centre and one or more states.

Solicitor General Tushar Mehta, appearing for the Centre, told a bench of Justices B R Gavai and Sandeep Mehta that Article 131 of the Constitution is "one of the most sacred" jurisdiction conferred upon the apex court and this provision can't be allowed to be misused and abused.

He said the cases referred to in the state's suit have not been filed by the Union of India.

"The Union of India has not registered any case. CBI has registered it," Mehta said, adding, "CBI is not under the control of the Union of India". The hearing in the matter is underway.

On November 16, 2018, the West Bengal government withdrew the "general consent" accorded to the Central Bureau of Investigation (CBI) to conduct a probe or carry out raids in the state.


# HC disposes of plea for ECI to formulate guidelines to curb deepfake use

**NEW DELHI :** The Delhi high court on Thursday disposed of a plea seeking directions for the Election Commission of India (ECI) to formulate guidelines to curb the use of deepfake technologies in political campaigns for Lok Sabha polls, saying it cannot devise a policy during elections.

It said the court's direction at this stage will be improper. "All of this is to be done before the elections. At the 11th hour, courts cannot interfere. At this moment, it will not be proper for the court to intervene with the jurisdiction of the ECI...Let us trust the ECI," a bench of Acting Chief Justice Manmohan and Justice Manmeet PS Arora told senior advocate Jayant Mehta, who represented the petitioner Lawyers Voice.

The plea said deepfakes and the dissemination of misinformation on social media platforms and the internet during elections threaten the foundation of a free and fair election. It underlined that rapid dissemination of deepfake content concerning political leaders could allow third parties to manipulate poll results.

The plea cited deepfake videos of Union minister Amit Shah, Congress leader Rahul Gandhi, and actors such as Ranveer Singh



and Amir Khan. It sought the taking down of these videos for spreading misinformation.

Mehta said there was a gap in the regulatory mechanism under the Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, 2021, which mandated social media intermediaries to act on the complaints within 24 hours. He added the period was too long. "They must pro actively act to ensure that once a particular video is deepfake...all those other URLs are also blocked down," Mehta said. He urged the court to direct ECI to tighten the mechanism and make it quicker.

The bench refused to accept Mehta's request, emphasising the mechanism was appropriate and could not be made faster. It added action could be taken against the culprits. "You cannot reduce the time. The mechanism that they have devised is appropriate no. They cannot make it faster. It cannot be shorter than 24 hours because they [intermediaries] say that we have got a billion users."

The bench said it was bound by the law. "We cannot go beyond the law. Rules have been framed.. what can we do?" It added there was no technology to stop the creation of deepfake, but those posting fake videos could be acted against and their names put in the public domain.

ECI's lawyer told the bench that the videos referred to in the plea have been taken down and cases have been registered. He said that the petitioner could send a representation to ECI, which would be decided before Monday.

The court noted the statement and directed the petitioner to file a representation while asking ECI to decide it by May 6. "In the event a comprehensive representation is filed by the petitioner with the ECI, the same shall be decided...the court directs the petitioners to file a representation during the course of the day. The ECI is directed to decide the representation as expeditiously as possible in view of the urgency. The counsel for the ECI states that the ECI shall decide it as expeditiously as possible on or before Monday. Accordingly, the plea stands disposed of," the court said.

# Delhi L-G approves removal of 223 DCW contract staff, says Swati Maliwal appointed them without permission

**NEW DELHI :** After Delhi Lieutenant Governor V K Saxena approved the removal of 223 contractual staff at the Delhi Commission for Women (DCW), deeming their employment "irregular" and illegal", the Department of Women and Child Development (WCD) said their services will be discontinued with "immediate effect".

Issuing an order on April 29, WCD deputy director Navlendra Kumar Singh said then chairperson of the DCW, Swati Maliwal, had appointed the staff on contract without the government's permission and against the rules. "Taking cognisance of all these irregularities and illegalities made by DCW, the Hon'ble Lieutenant Governor has approved the proposal of the department (Delhi government's Department of Women and Child Development) that the appointments of contractual staff engaged in DCW without having sanctioned posts and without following due procedures is void-ab-initio and the same cannot be allowed to continue in DCW," Singh said in the order.

"The approval of government is hereby conveyed to DCW to discontinue service of all contractual staff with immediate effect who have been appointed by the DCW at any point in time, by going beyond its delegated powers and without following various procedures laid down and in violation of DCW Act/rules/regulations/guidelines issued by Govt. of NCT of Delhi," the order read.

Singh said in his order the committee, formed by Delhi Lieutenant Governor V K Saxena to look into the illegal appointments, said in its report that 223 posts were irregular, the procedure was not followed and the approval of the LG had not been taken. He said the enhancement of the remuneration and allowances to the staff of DCW was without adequate justification and in violation of the laid down procedures and guidelines.



The order stated the DCW "violated the statutory provisions of DCW Act, 1994 and various standing instructions of the Department of Finance & Planning Department, GNCTD by creating 223 posts and engaging staff without following the due procedure".

"No study was conducted to assess the actual requirement of additional staff and eligibility criteria for each post, no administrative approval and expenditure sanctioned was obtained from the GNCTD for engaging such manpower and applications for such posts were not formally invited, role and responsibility for any of these posts were not assigned and emoluments of some of the incumbents which were decided at the time of initial appointment, were enhanced very sharply and arbitrarily," the order said.

Reacting to this, former DCW chairperson Swati Maliwal, who is now a Rajya Sabha member, posted a message on X, saying the LG has issued a 'Tughlaqi Farman' (diktat) to remove all the contract staff of DCW. In her post in Hindi, Maliwal said the DCW has a staff of 90 out of which only eight people have been provided by the government, the rest are on a three-month contract.

"If all the contract staff is removed, the Women's Commission will be locked. Why are these people doing this? This institution has been built with blood and sweat. Instead of giving it staff and protection, you are destroying it from its roots? I will not let the Women's Commission be closed as long as I am alive. Put me in jail, don't torture women," she added.

In 2020, a Delhi court framed charges against Swati Maliwal, who was the DCW chief then, for allegedly obtaining pecuniary advantages for her and AAP acquaintances, who were allegedly appointed to different posts of the women's body without following the due process. The court observed that appointments made in the DCW "clearly reflect nepotism".

Special Judge Dig Vinay Singh framed charges under Section 120-B (punishment for criminal conspiracy) and multiple offences under the Prevention of Corruption Act against Maliwal, and DCW members Promila Gupta, Sarika Chaudhary, and Farheen Malick.

Looking into the circumstances around which three persons were recruited to the posts of research assistant, media advocacy officer, and personal assistant, the court said, "The manner in which these three appointments were made in an opaque manner and without advertisement of vacancies, etc clearly reflects nepotism".

# भिवंडी स्थानकातील तिकीट खिडकी ४ वर्षांपासून बंद

## तिकीट आरक्षणासाठी तारेवरची कसरत करावी लागत असल्याने रेल्वे प्रशासनाविरोधात संताप

■ भिवंडी: भिवंडी रोड रेल्वे विभागामार्फत भिवंडीतील प्रवाशांसोबत गैरव्यवहार केला जात आहे.कोरोना महामारीपासून बंद असलेल्या सर्व ट्रेन पूर्ववत सुरू आहेत.परंतु असे असताना भिवंडी रोड रेल्वे स्थानकातील सामान्य व आरक्षित तिकीट खिडकी अद्यापी बंद आहे.त्यामुळे दोन पैकी एकच खिडकी सुरू असल्याने रेल्वे प्रवाशांना आरक्षित तिकीट मिळवण्यासाठी नाकीनऊ येत आहे.त्यामुळे प्रवाशांना आरक्षण तिकिटासाठी तारेवरची कसरत करावी लागत असल्याने प्रवाशांमधून रेल्वे प्रशासना विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

भिवंडी रोड रेल्वे स्थानक हा मध्य व पश्चिम रेल्वेला जोडणारा स्थानक आहे.दरम्यान भिवंडीत मोठया प्रमाणात युपी,बिहारसह इतर प्रदेशातील नागरिकांचा भरणा आहे.त्यामुळे १५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या भिवंडी शहराकरीता भिवंडी रेल्वे स्थानकात रेल्वे विभागातर्फे प्रवाशांसाठी दोन आरक्षण खिडक्या उपलब्ध करण्यात आल्या होत्या.मात्र जगभरात पसरलेल्या कोरोना महासंकटाने सुरुवातीपासूनच अनेक रेल्वेसह आरक्षण केंद्रेही बंद करण्यात आली होती.

त्यानंतर कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यावर हळूहळू सर्व रेल्वे सुरळीतपणे सुरू झाल्या.त्यासोबतच भिवंडी रेल्वे स्थानकातील दोन आरक्षण खिडक्यांपैकी एक खिडकी सुरू करण्यात आली.मात्र दुसरी खिडकी तब्बल ४ वर्षे उलटूनही बंदच आहे.तर संबंधित भिवंडी रेल्वे विभागाने तिकीटे कमी निघत असल्याच्या कारणाने ही आरक्षित खिडकी बंद ठेवल्याचे सांगितले आहे.



> दुसऱ्या खिडकीच्या अभावाने रेल्वे प्रवासी दुसऱ्या शहरात अथवा दलालांना शरण जात आहेत.त्यामुळे सदर खिडकी तूर्तास खुली करण्याची मागणी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे महाप्रबंधक यांच्याकडे केली आहे .तसे न झाल्यास प्रवाशांच्या सुविधेसाठी उत्तर भारतीय समाजाच्या लोकांना सोबत घेऊन लवकरच आंदोलन केले जाईल.
>
> ठाकूर कृष्णगोपाल सिंग
> अध्यक्ष,उत्तर भारतीय समाज सेवा समिती

> दररोज शहर व परिसरातील शेकडो नागरिक मूळगावी जाण्यासाठी आरक्षण तिकीट काढण्यासाठी येतात, मात्र भिवंडी रोड स्थानकावर एकच आरक्षण खिडकी उघडी असल्याने लोकांना ते शक्य होत नाही. रात्रंदिवस रांगेत उभे राहूनही तिकीट मिळणे कठीण झाले असून, भिवंडीत प्रवाशांना कल्याण, ठाणे व इतर शहरांतही फेऱ्या माराव्या लागत आहेत.याठिकाणी तिकिटे मिळत नसून रेल्वे अधिकारी आणि आरपीएफने येथे दलाल ठेवले आहेत.त्यामुळे नागरिकांना येथून तिकीट मिळणे कठीण झाले आहे.
>
> अशोक दुबे
> रेल्वे प्रवासी,भिवंडी




> भिवंडी रेल्वे स्थानकात एक आरक्षित खिडकीवर दररोज दोन सत्रांत फक्त १२० फॉर्म येत आहेत. याशिवाय भिवंडीत चार खाजगी आरक्षण केंद्र उपलब्ध आहेत. ही ५ केंद्रे मिळून दररोज २५० ते ३०० फॉर्म येत आहेत. आरक्षण फॉर्म वाढवण्यासाठी रेल्वे विभाग प्रयत्नशील आहे. त्यामुळे फॉर्मच्या संख्येत वाढ झाल्यानंतरच बंद आरक्षण खिडकी उघडली जाईल. एका महिन्यात पाच आरक्षण खिडक्या मिळून १ कोटी ७५ लाख रुपये जमा होत आहेत. आवश्यकता नसल्याने खिडकी बंद ठेवली आहे. दुसरी आरक्षण खिडकी उघडल्याने कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करावी लागणार आहे. जे सद्यस्थितीत शक्य नाही. त्यामुळे तिकिटांची संख्या वाढल्यानंतर दुसरी खिडकी उघडण्यात येईल.
>
> प्रवेश कुमार चौधरी
> मुख्य वाणिज्य निरीक्षक भिवंडी रेल्वे स्थानक

# पोलीस हवालदाराला मद्यधुंद तरुणाची मारहाण

■ बोईसर : मनोर-पालघर रस्त्यावरील मासवण पेट्रोलिंग करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर मद्यधुंद तरुणाने हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शनिवारी रात्रपाळीच्या ड्युटी दरम्यान मासवन गावातील बँक ऑफ बरोडाच्या आवारातील क्यूआर कोड स्कॅन करण्यासाठी जात असलेल्या पोलीस हवालदार आयुब शेख यांच्यावर मद्यधुंद तरुणाने हल्ला करून मारहाण केली. याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

पोलीस हवालदार आयुब शेख शनिवारी रात्रपाळीच्या ड्युटीवर होते. रात्री १२.३०च्या सुमारास मनोर पालघर रस्त्यावरील मासवन गावाच्या हद्दीतील प्रिया पेट्रोलपंपावरील क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर बँक ऑफ बडोदाच्या परिसरातील क्युआर कोड स्कॅन करण्यासाठी जात होते. मासवन नागझरी रस्त्यावर वळण घेत असताना नाक्यावर एक कार समोर उभी राहिली. रस्ता अडवल्याने शेख यांनी कार बाजूला करण्याची विनंती केली होती. याचा राग आल्याने कारचालक गौरांग विशाल संखे याने शिवीगाळ सुरू केली. परंतु शेख यांनी ते पोलीस असल्याची माहिती देत शासकीय कर्तव्य बजावत असल्याचे सांगितते. त्यानंतरही संखे याने कार मधून लोखंडी पाईप काढत आयुब शेख यांना मारहाण केली. याप्रकरणी पोलीस हवालदार आयुब शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गौरांग संखे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पार्सल पकडल्याचे सांगून लाखांचा गंडा

■ ठाणे : इराणला पाठवलेले पार्सल पोलिसांनी पकडले असल्याचे सांगत ६ लाख ७४ हजार ५४१ रुपयांची रक्कम लाटणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.तक्रारदार राजस सुशील दळवी यांना शनिवारी त्यांच्या मोबाईलवर एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला. तीने आपण फेडेक्स कुरियर मधून बोलत असल्याचे सांगून मुंबईवरून इराणला पाठवण्यात आलेले पार्सल पोलीसांनी पकडले असल्याचे सांगत लुबाडले.

# नवी मुंबईत वृक्षछाटणीनंतर फांद्या रस्त्यावर

## पदपथावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांसमोर अडथळा

■ ऐरोली : शहरातील मोठे पावसाळी नाले व गटारे साफसफाईची कामे मार्गी लावण्याकरिता महापालिका आयुक्तांनी पुढाकार घेत ही कामे तसेच वृक्षछाटणीबाबत कार्यवाही सुरू केली आहे. शहरात विविध ठिकाणी गटारातून काढलेला गाळ पदपथावरच अनेक दिवस पडून राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. आता उद्यान विभागामार्फत झाडांच्या तसेच धोकादायक स्थितीमधील फांद्या छाटणीची कामे सुरू झाली आहेत. परंतु वृक्षछाटणीच्या फांद्या पदपथावर व रस्त्यावरच पडून राहत असल्याने त्याचा नागरिकांना अडथळा होऊ लागला आहे.

महापालिकेतर्फे पावसाळापूर्व कामे वेगाने सुरू झाली आहे. मे अखेरपर्यंत ही कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. पावसाळी गटारे साफसफाईची कामे तसेच शहरातील मोठे नाले सफाईची कामे मे अखेरपर्यंत पूर्ण करण्याची मुदत देण्यात येते. त्याप्रमाणे पालिकेने कामाला सुरुवात केली आहे.

पावसाळी गटारे व नाले यातून साफसफाईनंतर बाहेर काढून ठेवण्यात येणारा गाळ १ ते २ दिवसांत सुकल्यानंतर लगेच उचलावा व काढलेला गाळ जाड पॉलिथिन किंवा सिमेंटच्या गोण्यांवर काढून ठेवावा, असे निर्देश दिले आहेत, मात्र याकडे ठेकेदार दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे गाळ रस्त्यावर व पदपथावरच खाली टाकण्यात आलेला पाहायला मिळतो. याबाबतही पालिकेने काळजी घेण्याची आवश्यकता आहे.



> झाडांच्या फांद्या छाटल्यानंतर त्या हटवण्यात आल्या पाहिजेत. यासंदर्भात पालिका कर्मचाऱ्यांना विचारणा करण्यात येऊन त्या हटवण्याचे सूचित करण्यात येईल. तसेच कामात हलगर्जीपणा केल्यास त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
>
> –सुनील पवार, अतिरिक्त आयुक्त, पालिका

धोकादायक वृक्षांची पाहणी करून त्यानंतर ते हटवण्याची कार्यवाही करण्यात येते. उद्यान विभागामार्फत वृक्षछाटणीबाबत विभागवार कार्यवाही सुरू करण्यात आली असून फांद्या मात्र रस्त्यावरच टाकल्या जात आहेत. त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

# मतदान जागृतीसाठी पालिकेकडून मॅस्कॉट तयार

■ ठाणे : येत्या २० मे रोजी होणाऱ्या मतदानास जास्तीत जास्त नागरिकांनी प्रतिसाद द्यावा. यासाठी स्विपअंतर्गत जनजागृती करण्यात येत आहे. ठाणे महापालिकेने या मतदान जागृतीसाठी शुंभकर (मॅस्कॉट) तयार केला असून तो ठाणे महापालिका क्षेत्रात जागृती करणार आहे. या मॅस्कॉटचे अनावरण ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात केले.त्यावेळी, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी,प्रशांत रोडे यांच्यासह उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, उमेश बिरारी, तुषार पवार आदी उपस्थित होते.

ठाणे महापालिका क्षेत्रातील सेंट्रल पार्क सारखी मोठी उद्याने,मॉल, एस टी स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन आदी भागात हा मॅस्कॉट मतदान करण्याचा संदेश ठाणेकर मतदारांपर्यंत पोहोचवणार आहे. असे ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले. तसेच, मॅस्कॉटच्या अनावरणाच्या निमित्ताने, मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. येत्या २० मे २०२४ ही तारीख लक्षात ठेवून सर्व नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी नागरिकांना पुन्हा केले आहे.लोकशाही बळकट करणे आपल्या प्रत्येकाच्या हातात असून त्यासाठी सर्वांनी मतदान करणे आवश्यक आहे. मतदानाचा दिवस हा सोमवारचा आहे. त्यामुळे शनिवार-रविवार जोडून सुट्टया जरी आल्या असल्या तरी मतदानाच्या दिवशी आपले राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, असेही आयुक्त राव यांनी आवाहन केले.जिल्हा निवडणूक कार्यालयाकडून आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेत मतदारांचा सहभागी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत मतदार जागृतीकरता विविध उपक्रम राबविले जात आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेनेही जाहिराती, बॅनर्स, सोशल मिडिया, आशा सेविका तसेच महापालिकेच्या विविध उपक्रमातंर्गत मतदान जनजागृती करण्यात येत आहे.



## तरुणीचा मोबाईल लंपास

■ नवीन पनवेल : गर्दीमध्ये एका २६ वर्षीय तरुणीचा मोबाइल चोरल्याची घटना घडली. याप्रकरणी तिने तक्रार दाखल केल्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तरंगिनी शर्मा या कामोठे, सेक्टर २१ येथे राहतात. २८ एप्रिलला त्या मॅकडोनाल्ड समोरील शिवनेरी बस थांबा येथे बसची वाट बघत उभ्या होत्या. काही वेळातच थांब्यावर बस आली. त्यावेळेस बसमध्ये बसण्याकरता गर्दी झाली. यावेळी एका व्यक्तीने त्यांना धक्का दिला. तेव्हा त्याला जागा द्यावी म्हणून त्या बाजूला झाल्या व कंडक्टरला बसायला जागा आहे का अशी विचारणा केली. यावेळी ऑनलाईन तिकीट काढण्याकरिता खिशात मोबाईल तपासला असता तो सापडला नाही.

## तोंडली येथे लागलेल्या आगीत लाकडे, गवत जळून खाक

■ मुरबाड: मुरबाड तालुक्यातील तोंडली येथील शेतकरी तथा माजी सभापती रामभाऊ बांगर यांच्या शेतावर असणाऱ्या विद्युत डीपीतील लूज कनेक्शनमुळे शॉर्ट सर्किट होऊन लागलेल्या आगीत सात आठ ट्रक जळाऊ लाकडे व गवत जळून खाक झाले.

मुरबाड महावितरण कंपनीने बसवलेल्या डीपी मध्ये लूज वायर कनेक्शनमुळे आगीचे गोळे गवतावर पडून आगीने लाकडे व गवत भस्मसात झाले. याबाबत तत्काळ शेतकरी तथा माजी सभापती रामभाऊ बांगर यांनी टँकर बोलवून आग आटोक्यात आणली.

या घटनेची माहिती मुरबाड महावितरण कंपनीचे उपअभियंता केतन थत्ते देण्यात आली आहे. त्यांनी तात्काळ महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याचा आदेश दिला आहे.

## कंपनीचे ६ .८४ लाखांचे वायर बंडल लांबवले

■ ठाणे: ठाण्याच्या आयकीन ढोकाळी येथे युनिक इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने घेतलेल्या १२ इमारतींच्या वायरिंग कामासाठी आणलेल्या वायर बंडल पैकी ६ लाख ८४ हजाराच्या तांब्याच्या तारेच्या वायर बंडल्स अज्ञात व्यक्तीने लांबवल्याची तक्रार सुपरवायझर आदित्य मणी त्रिपाठी(२९) यांनी कापूरबावडी पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

ठाण्याच्या ढोकाळी परिसरातील आयकिन या गृह प्रकल्पाच्या टोलेजंग इमारतीच्या वायरिंगचे काम हे युनिक इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने सन २०२३ मध्ये घेतले होते. दरम्यान या वायरिंगच्या कामासाठी विविध गेजच्या तांब्याच्या तारा असलेले वायरिंगचे बंडल स्टोअर मध्ये ठेवलेले होते. कामासाठी लागेल तसे वायरचे बंडल रजिस्टरमध्ये नोंद करून घेतले जायचे ८ एप्रिल, २०२४ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमर्स कंपनीचे स्टोअरकिपर रणजित कुमार यांनी तक्रारदार याना बोलावून स्टोअरमध्ये ठेवण्यात आलेले इलेक्ट्रिक सामान हे दिसून येत नाही. यावर तक्रारदार आदित्य याने साईट इन्चार्ज यांना बोलावून विचारणा केली. तेव्हा कल्पना नसल्याचे सांगितले. स्टोअरकिपरच्या खात्यात तब्बल विविध गेजचे तांब्याच्या तारा असलेले वायर बांदल अज्ञाताने लांबविल्याचे कलाक्षात येताच तक्रारदार आदित्य त्रिपाठी यांनी कापूरबावडी पोलीस ठाण्यात ६ लाख ८४ हजाराचे बांदल लांबवल्याची तक्रार दाखल केली.

# गुंडगे ग्रामस्थ घालणार निवडणुकीवर बहिष्कार!

## घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा मुद्दा



■ कर्जत : कर्जत शहरातील गुंडगे गावातील डम्पिंग ग्राऊंड हटवण्यासाठी घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीच्या माध्यमातून कर्जत नगरपरिषदेवर मोर्चा काढला होता. त्याचबरोबर वेळोवेळी त्यांना निवेदन दिले आहेत, परंतु तरी देखील कर्जत नगरपरिषद याकडे लक्ष देत नसल्याने आम्हाला हा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा पर्याय शिल्लक राहिला आहे. म्हणून आम्ही गुंडगे परिसरातील पंचशील नगर, संत रोहिदास नगरमधील रहिवासी येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीवर जाहीर बहिष्कार घालत आहोत, असे समिती अध्यक्ष महेंद्र कानिटकर यांनी जाहीर केले आहे.

गुंडगे गावाच्या हद्दीत पालिकेचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आहे. या प्रकल्पातून दुर्गंधी पसरत असून, सायंकाळपासून रात्रभर वाऱ्यासोबत येणाऱ्या कोंदट वासामुळे गुंडगे गाव, पंचशील नगर, संत रोहिदास नगर परिसरातील रहिवाशी यांना श्वसनाचे आजार जडले आहेत. त्यामुळे हा प्रकल्प हटवण्यात यावा, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही आणि त्यामुळे घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीच्या माध्यमातून रायगड जिल्हाधिकारी यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. हे डम्पिंग ग्राऊंड पर्यायी जागेवर हलविण्यात यावे याकरिता आम्ही कर्जत नगरपरिषदेवर आक्रोश मोर्चा काढला, कर्जत नगरपरिषदेसोबत पत्रव्यवहार देखील केला, मात्र त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. त्यामुळे आम्ही येत्या लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. १३ मे २०२४ रोजी होणाऱ्या मावळ लोकसभा मतदारसंघातही मतदान होत असून, गुंडगे गाव तसेच परिसरातील नागरिक मतदान करणार नाहीत. या सर्व प्रक्रियेला कर्जत नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहणार असल्याचे सांगितले आहे.

गुंडगे येथील सर्व्हे नं. ६० मधील शासकीय जागेतील डम्पिंग ग्राऊंड हटवण्यात यावे, डम्पिंग ग्राऊंडमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून त्यांची सुटका करावी, डम्पिंग ग्राऊंडच्या शेजारी नव्याने सुरू असलेल्या सर्पोद्यान आणि विज्ञान पार्कसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर झाला आहे, मात्र आमच्या परिसरातील रस्ते, गटारे तसेच इतर सुविधांसाठी आपल्याकडे निधी उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते.

## उभ्या वाहनावर रिक्षा धडकून चालकाचा मृत्यू

■ ऐरोली : येथील सेक्टर १० मध्ये प्रवासी घेऊन जाणारी भरधाव रिक्षा सिग्नलवर उभ्या असलेल्या वाहनावर धडकल्याने झालेल्या अपघातात रिक्षा चालकाचा मृत्यू तर महिला प्रवासी जखमी झाल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. या अपघाताला मृत रिक्षाचालक जबाबदार असल्याचे आढळून आल्याने रबाळे पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या अपघातातील मृत रिक्षा चालकाचे नाव गोवर्धन करपे (५०) आहे. ते ऐरोली सेक्टर १० मध्ये राहणाऱ्या महिला प्रवासी पूजा शिंदे (३४) यांना रिक्षामधून घेऊन जात होते. यावेळी ऐरोली से- ८ मधील सिग्नल लागल्याने पाठीमागून भरधाव वेगाने येणारी करपे यांची रिक्षा पुढे उभ्या असलेल्या वाहनावर जोरात धडकली. या अपघातात करपे यांचा मृत्यू झाला, तर महिला जखमी झाली.

# डहाणू शहराची होतेय कोंडीने घुसमट

## ■ बेशिस्त चालक ■ फेरीवाल्यांचे आक्रमण ■ गाड्यांचे बेकायदा पार्किंग

■ डहाणू : वेगाने नागरीकरण झालेल्या डहाणू शहरातील स्टेशन भागात सध्या नागरिकांना रस्त्यावरून चालणे कठीण झाले आहे. फेरीवाल्यांचे आक्रमण, गाड्यांचे बेकायदा पार्किंग या समस्या तीव्र आहेत. तरीही संबंधित प्रशासन त्याकडे डोळेझाक करत असल्याचे दिसते. इराणी रोड, थर्मल पावर रोड, लोणीपाडा, डहाणू स्टेशन बिरसा मुंडा चौक या भागात संध्याकाळ आणि सकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे.

यातच इराणी रोडच्या अरुंद मार्गावर नगर परिषदेने जाळी बसवली आहे. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी डोकेदुखी ठरला आहे. सायंकाळच्या वेळी या मार्गावरून वाहन काढणे म्हणजे कसरत करण्यासारखे वाटू लागले आहे. डहाणू रेल्वे स्थानाकाच्या गेटवर डहाणू आगर, नरपड, सावटा, सरावली, डहाणू गाव, कैनाड, लोणीपाडा याकडे जाणाऱ्या रिक्षा लागलेल्या असतात. त्यातच अवजड वाहने आली की, हा रस्ता वाहतुकीसाठी पुरता बंद होतो. परिणामी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. वाहतूक पोलीस वेळोवेळी वाहतूकदारांना नियम लावून देतात. मात्र वाहनांची दररोजची रेलचेल पाहता वाहतूक कोंडीची समस्या डहाणूकरांना न सुटणारा प्रश्न गंभीर बनला आहे.

डहाणू शहराची लोकसंख्या ६० हजारांहून अधिक आहे. गेल्या अनेक वर्षांत शहरात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले असून, अजूनही लोक राहायला येत आहेत. त्यामुळे सोयीसुविधांवर ताण पडत आहे. येथे वाहतूक कोंडीच्या संस्थेने उग्र रूप धारण केले आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांना आळा घालणे अशक्य होत आहे. रिक्षाची वाट बघत असलेले लोक रस्त्यात उभे राहतात. रिक्षाचालक मधेच गाड्या थांबवून प्रवासी बसवतात व उतरवतात.

यामुळे वाहतुकीची गती मंदावते. रस्त्याच्या कडेने न चालता अनेकदा नागरिक रस्त्यावरून चालत असल्याने त्याचाही त्रास होतो. शहरात सगळीकडे बेकायदा पार्किंग समस्या भेडसावत आहे. नो पार्किंग झोनमध्येही गाड्या लावल्या जातात. इराणी रोड या मुख्य रस्त्यांवरील दुकानात जाण्यासाठी असलेले लोक रस्त्यावर गाड्या पार्किंग करून निघून जातात. दुचाकीचे प्रमाण जास्त आहे. पालिका प्रशासन, वाहतूक पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नाने हा वाहतुकीचा प्रश्न सोडवणे गरजेचे आहे.



■ एकदा डहाणू पोलीस आणि डहाणू नगर परिषद यांनी वाहतूक नियोजनासाठी संयुक्त आराखडा तयार केला होता. त्यानुसार टेम्पोस्टॅण्ड, मिनी रिक्षा स्टॅण्ड हलवण्यात आला. पण त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे डहाणूकरांना वाहतूक कोंडी डोकेदुखी ठरत आहे.

## पालिकेचे ३८ कर्मचारी अखेर सेवानिवृत्त

■ ठाणे : एप्रिल महिन्यात ठाणे महापालिकेच्या सेवेतून ३८ अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. यात शिक्षण विभागातील शिक्षकासह सफाई कामगारांची संख्या जास्त आहे. महत्त्वाचे म्हणजे पालिकेच्या

# नवीन भरती नसल्याने जुन्या कर्मचाऱ्यांवर भार


सेवेतून मागील काही महिन्यांत मोठ्या प्रमाणावर कर्मचारी निवृत्त होत आहेत. पण, त्यांच्या जागी नवीन भरती होत नाही. परिणामी पालिकेतील सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडताना दिसून येतो.

ठाणे महापालिकेच्या प्राथमिक १११ आणि माध्यमिक २३ अशा मिळून १३४ शाळा आहेत. या शाळांमधून सद्यस्थितीत ३५ हजार ४१२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पालिका शाळांमध्ये ९०० पदे मंजूर असली तरीदेखील प्रत्यक्षात ६७० शिक्षकच उपलब्ध आहेत. त्यामुळे एका एका शिक्षकाला दोन-दोन वर्ग शिकवण्याची जबाबदारी पार पाडावी लागत आहे. त्यात सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या वाढतांना दिसत आहे. त्यामुळे आहे त्या शिक्षकांच्या खांद्यावर पुन्हा जबाबदारी वाढणार असल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे फेब्रुवारी महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांबरोबर १२ सफाई कामगारांची संख्याही वाढल्याचे दिसत आहे. त्यात एप्रिल महिन्यात त्यात आणखी १४ सफाई कामगारांची भर पडली आहे. पालिका सेवेत २०१५ ते डिसेंबर २०२३ पर्यंत दीड हजाराहून अधिक कर्मचारी, अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यात २०२४ सुरू होताच, पहिल्याच महिन्यात २७ कर्मचारी, अधिकारी हे सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात त्यात आणखी २३ जणांची भर पडली आहे. याचाच अर्थ दोन महिन्यांत ५० अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने पालिकेत आणखी पोकळी वाढत जात आहे.

यात शहर विभागातील उपनगर अभियंता नितिन येसुगडे, कळवा हॉस्पिटलमधील डॉ. शैलेश्वर नटराजन (प्राध्यापक), चित्रा लहिरे, रमाकांत बुरपुल्ले (कार्यालयीन अधीक्षक), भरत लोखंडे (मुख्याध्यापक), पाच प्राथमिक शिक्षक, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, वाहनचालक, शिपाई, आया, मुकादम, बिगारी, सुपिरिअर फिल्ड वर्कर आणि १४ सफाई कामगारांचा समावेश आहे.

# यूपीतील मेफेड्रॉनचा कारखाना उद्ध्वस्त



■ ठाणे : :उत्तर प्रदेशातील मेफेड्रॉन या अमली पदार्थाच्या पावडर निर्मितीचा आणखी एक कारखाना ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या युनिट एकच्या पथकाने उद्ध्वस्त केल्याची माहिती पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी मंगळवारी दिली. यामध्ये वाराणसीमधील सूत्रधार संदीप तिवारी यासह सहाजणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून एमडी पावडरसह २० कोटी १८ लाख ४९ हजार ७१८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यापूर्वी याच प्रकरणात ठाण्यातील कासारवडवली पोलीस ठाण्यात २४ जानेवारी २०२४ रोजी एनडीपीएस अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. यामध्ये आफताब मलाडा याच्यासह सातजणांना अटक केली होती. सुरुवातीला केवळ १५ ग्रॅम एमडी पावडरसह दोघांना ठाणे पोलिसांनी अटक केली होती. सखोल चौकशीत उत्तर प्रदेशातून २७ कोटी ७८ लाख ५५ हजारांचा मुद्देमालासह एमडी पावडर निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त केला होता. यामध्ये क्रिस्टल पावडर बनविण्याच्या पदार्थांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता.